# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,शिरडीचे अधिकृत मासिक



जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


**श्रीसाई वाक्सुधा**


वर्ष ६० वे )  किंमत एक रुपया  ( अंक ५ वा

ऑगस्ट १९८१

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४२२६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

अविद्या प्रसवे देहबुद्धी ।
देहबुद्धी आधि–व्याधि ।
तीच कीं लोटी विधिनिषेधीं ।
आत्मसिद्धी विघातक ॥ १६१ ॥

म्हणाल आतां मी आहे कोठें ।
आतां मी तुम्हां कैसा भेटें ।
तरी मी तुमचिया हृदयींच तिष्ठें ।
विनाकष्टें सन्निकट ॥ १६२ ॥

म्हणाल हृदयस्थ कैसा कोण ।
कैसें काय त्याचें लक्षण ।
ऐसी काय तयाची खूण ।
जेणें त्या आपण जाणावें ॥ १६३ ॥

तरी व्हावें दत्तावधान ।
परिसा तयाचें स्पष्ट व्याख्यान ।
जयालागीं जाणें शरण ।
तो हृदयस्थ कोण हे आतां ॥ १६४ ॥

नाना नामें नानारूपें ।
सृष्टी माजीं भरली अमूपें ।
जयांची कवणा न करवती मापें ।
मायेचीं स्वरूपें ती अवघी ॥ १६५ ॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ४४ वा



श्रीगणेशाय नमः
ॐ नमोजी हेरंबा
सकळादि तू प्रारंभा
आठवूनि तुझी स्वरूपशोभा
वंदन भावे करीतसे

# अनुक्रमणिका—ऑगस्ट १९८१

| | |
|---|---|
| १) संपादकीय | – भावेषु विद्यते देवः |
| २) श्री संत लहानुजी महाराज | – |
| ३) गाठीभेटी–डॉ. बावरे | – साईनंद |
| ४) श्रीसाईबाबांची चावडी | – सदानंद चेंदवणकर |
| ५) श्रीसाई साक्षात्कारी दिव्यावतार | – श्री. बाळकृष्ण अ. देसाई |
| ६) निष्कलंक | – सौ. उषा अधिकारी |
| ७) मी पाहिलेले साईबाबा | – श्री. शांताराम रा. खडके |
| ८) मूर्ती, पोथी आणि प्रचिती | – प्रा. र. श्री. पुजारी |
| ९) संतांच्या अकल्पितभेटी | – कु. प्रिती देशमुख |
| १०) हो खरंच बाबांनीच जागा दिली | – सौ. सुधना करमरकर |
| ११) दोन स्वप्ने | – श्री. सुरेश सातपुते |
| १२) श्रीसाईकृपेने पार पडलेले एक लग्न | – श्री. जगदीश देवपुरकर |
| १३) श्रीसाईकृपा | – श्री. गणपतराव सामंत |
| १४) श्री रणछोडराय | – कर्नल मु. बा. निंबाळकर |
| १५) संत चूडामणी साईबाबा प्रकाशन समारंभ | — |
| १६) श्रीसाईगीत तुषार | – श्री. सुहास देसाई |
| १७) पाच तत्वे | – श्री. हरीभाऊ बोबडे |
| १८) संतांची फुले | – श्रीमती लीला गुजराथी |
| १९) साईबाबांचा संदेश | – श्री. मनोज वेंद्रे |
| २०) नौकेचा आधार | – सौ. कुमुदिनी टिळक |
| २१) शिरडीचे साईबाबा | – सौ. लीलावती उपाध्ये |
| २२) पादुकांची आस | – श्रीमती श्री शहाणे |
| २३) कै. पुजारी मालेरावजी | — |
| २४) शिरडी वृत्त | – जून १९८१ |
| २५) साईकलाकारांना सुवर्णसंधी | |

# भावेषु विद्यते देवः

भागवत धर्मात बुद्धीपेक्षा भावाला आणि भावनेला अतिशय महत्त्व आहे. ज्ञानापेक्षा ज्ञानपूर्वक भक्ती किंवा ज्ञानरहित भक्ती श्रेष्ठ मानली जाते.




भाव शब्दाचा अर्थ असणे असा आहे. देवाचा भाव म्हणजे देवाचे अस्तित्व मानणे. देव हा दयाळू आहे, तो न्यायी आहे, सर्व शक्तिमान आहे, तो षड्गुणसंपन्न आहे व सर्वसाक्षी आहे. देवाचे अस्तित्व अखंड स्मरून केली जाणारी भक्ती ही भाव युक्तभक्ती होय.

तुका म्हणे अवघे फिके भावाविण ॥
मीठ नाही अन्न तेणे न्याये ॥

अन्नात जर मीठ नसेल तर ते अन्न खाण्यास जसे कोणाला आवडणार नाही त्याप्रमाणे भक्तियोगात भावाचे महत्त्व आहे. भाव तेथे देव,,"ही म्हण प्रसिद्ध आहे भक्ती म्हटली की तेथे भाव असणे अत्यंत आवश्यक आहे. भावावाचून भक्ती ही कल्पनाच अयोग्य वाटते. पण जगात काही ढोंगी साधु असतात. ते भावावाचून कोरडी भक्ती करतात. अशा ढोंगी साधूवर अनेक संतांनी कोरडे ओढले आहेत.

टीळा टोपी उंच दावी । जगी म्हणे मी गोसावी ॥

कपाळाला गंध लावणे, डोक्यात उंच टोपी घालणे, गळयात: माळा घालणे, अशासारखी बाह्य लक्षणे ठेवून आपल्या साधुत्वाचा देखावा करणारे बरेच साधु समाजात वावरताना दिसतात. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना फसविणे, हेच त्यांचे कार्य असते.

भावेवीण भक्ति भक्तीवीण मुक्ति ॥
बळेवीण शक्ति बोलू नये । ज्ञानदेव हरिपाठ ॥

भावाशिवाय भक्ती घडणे शक्य नाही.

मोले घातले रडाया । नाही आसू आणि माया ॥
तैसा भक्तिवाद काय । रंग बेगडीचा न्याय ॥

काही समाजात अशी पद्धत आहे की, एखादा श्रीमंत मनुष्य मरण पावला

ण्याचे नाटक करत असतात पण त्यांच्या ठिकाणी मेलेल्या मनुष्याबद्दल माया नसते. रडताना त्यांच्या डोळयात अश्रू नसतात.

सासूसाठी रडे सून । भाव अंतरीचा भिन्न ॥

आई मेली म्हणून तिच्या मुलीला अतिशय दुःख होते म्हणून ती मुलगी रडत असते. सासू मेली म्हणून सूनदेखील रडत असते, पण सुनेचे रडणे हे फक्त लोकांना दाखविण्यासाठी असते. तिला मुलीइतके दुःख झालेले नसते.

तुकाराम शिष्या बहिणाबाई भावासंबंधी म्हणतात,—

बहिणी म्हणे भाव तोचि आम्हा देव ।
नाही या संदेह अणुमात्र ॥

भाव हाच देव आहे. यात थोडादेखील संदेह नाही. 'भावेषु विद्यते देवः' हे म्हणणे अगदी सत्य आहे.

गुळावीण कैची गोडी । कळो येईल आवडी ।
तैसा देव भावेवीण । कैसा जाणावा आपण ॥

ज्याप्रमाणे गुळ खाल्ल्याशिवाय गोडी कळत नाही त्याप्रमाणे भाव असल्या शिवाय देव कळू शकत नाही.

ये यथा मां प्रपद्यन्ते । तांस्तथैव भजाम्यहम् ॥

जे लोक माझी ज्याप्रमाणे भक्ती करतात त्याप्रमाणे मी त्यांना पावतो, असे श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे.

तुका म्हणे मुख्य । पाहिजे हा भाव ।
भावापाशी देव । शीघ्र उभा ॥

मुख्य गोष्ट म्हणजे भाव पाहिजे. भाव नसेल तर देव मिळू शकत नाही व भाव असेल त्याला तबडतोब देव प्राप्त होऊ शकतो.

हाकेसरशी उडी घालोनिया स्तंभ फोडी ।
ऐसा कृपावंत कोण माझे विठाई वाचून ॥

प्रल्हादाने देवाला हाक मारल्याबरोबर देव खांब फोडून बाहेर आले व त्यांनी [illegible] अंगी असलेला भाव.

भाव धरी तया तारील पाषाण ।

भाव धरणाराला पाषाणदेखील तारू शकतो.

पाषाणाचे नाव ठेवियेले देव ।
काशिका तारी भाव परि तो तैसा ॥
तुका म्हणे त्याचा भाव तारी त्यास ।
अहंभावी नास तोचि पावे ॥

एखाद्या पाषाणाला देव म्हटले तरी तो जसाच्या तसाच असतो. भक्ताला ते तारीत नाही. त्याच्या ठिकाणी असलेला भक्ताचा अहंकाररहित देव-भाव त्याला तारतो.

वैभवाचे धनी सकळ शरणागत ।
सत्यभावे चित्त अर्पिले ते ॥
नेदी उरो देव आपणा वेगळे ।
भावाचिया बळे ठायाठाव ॥

आपले चित्त परमेश्वराला समर्पण करून जे लोक त्याला शरण जातात त्यांना ईश्वर आपल्या वैभवाचे स्वामी करतो. त्यांना आपल्यापेक्षा वेगळे राहू देत नाही. भावाचे सामर्थ्य असे की, त्यामुळे देव भक्ताला आपल्यामध्ये सामावून घेतो.

कासया पाषाण पूजिसी पितळ ।
अष्ट धातु खळ भावेवीण ॥
भावचि कारण भावचि कारण ।
मोक्षाचे साधन बोलियेले ॥

दुष्ट लोक दगड, पितळ किंवा अष्टधातूंची प्रतिमा करून त्यांची पूजा करतात. पण त्या ठिकाणी जर भाव नसेल तर त्यांची पूजा व्यर्थ आहे.

जैसे दगड येती वरी । मंत्रपुष्पे देवा शिरी ॥

भावाशिवाय जर देवाचे पूजन केले तर देवाला असे वाटते की, जणू काही देवाच्या डोक्यावर दगड येत आहेत.

उंच निच काही नेणे हा भगवंत ।
तिष्ठे भाव भक्त देखोनिया ॥

भक्त हा उच्च वर्णाचा आहे किंवा निच वर्णाचा आहे, याचा विचार देव कधीच करीत नाही. जेथे भक्त व त्याचा भाव आहे तेथे तो तिष्ठत असतो.

आमुच्चिया भावे तुज देवपण ।
ते का विसरोन राहिलासी ॥

आमच्या भावामुळे तुला देवपण प्राप्त झाले आहे, ही गोष्ट तू विसरू नको; असे तुकारामांनी देवाला स्पष्टपणे बजावले आहे.

तयासी नेणती बहु आवडती ।
होय जया चित्ती एकभाव ॥

परमेश्वराला नेणते भक्त अतिशय आवडतात. फक्त त्यांच्या ठिकाणी एकनिष्ठ भाव पाहिजे.

वेडी गौळियांची पोरे । त्यांचे ताक प्यालो बा रे ॥

गोपाळांनी दिलेले उष्टे ताकदेखील श्रीकृष्णाने प्राशन केले, कारण त्यांचा श्रीकृष्णाचे ठिकाणी एकनिष्ठ भाव होता.

सर्व भावे लोभ्या आवडे हे धन ।
आम्हा नारायण तैशापरी ॥

लोभी माणसाला ज्याप्रमाणे धन अतिशय आवडते त्याप्रमाणे भक्ताला देव आवडतो.

पुण्यतिथी निमित्य खास लेख

# श्रीसंत लहानुजी महाराज

**जपी तपी ना भजनी, योगी आत्मालापी निजसंवादी।**
**विदर्भभाषी अंतर्ज्ञानी लहानुजी गमती ॥**

विसाव्या शतकातील वैदर्भीय संतमंडळीत ज्येष्ठ आणि श्रेष्ठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री संत लहानुजी महाराजांनी श्रावणी पौर्णिमेस ( दि. ६ ऑगस्ट १९७१) या मृत्युलोकाचा निरोप घेऊन निजधामी गमन केले ! त्या चंद्रग्रहणाच्या दिवशी दुपारी १ वाजून ५५ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत अनंतात विराम पावली ! जिवाजिवांना उत्क्रांतिपथावर आरूढ करण्याचे, त्यांच्या प्रगतीचा सोपान निर्विघ्न करण्यासाठी श्रमपूर्वक झिजण्याचे आपले सत्कार्य अखेरच्या श्वासापर्यंत करीत. रक्षाबंधनाच्या पवित्र दिनी त्यांनी ' आम्ही जातो अमुच्या गावा। अमुचा रामराम घ्यावा ' या भावनेने इहलोकीचा निरोप घेतला ! जगत् हितार्थ निरलसपणे कष्टणारा एक पुण्यात्मा या मृत्युलोकावरील आपला विहार संपवून–पूर्ण करून अनंतात विराम पावला !

लहानुजी महाराज गेले ! आता त्यांची ती पावन वाणी, परमार्थपथावर मार्गदर्शक ठरणारी त्यांची ती लोकविलक्षण अस्सल वऱ्हाडी मराठमोळी वाणी पुन्हा ऐकू येणार नाही ! त्यांची ती मर्मभेदक दृष्टि, जिवाची सारी मलिनता क्षणार्धात धुवून काढणारी त्यांची ती कृपामय दृष्टि आता पुन्हा कधी पहायला मिळायची नाही !

विदर्भ ही तर संतांची भूमि ! इथल्या पावन मातीने अनेक पवित्र नि दिव्य जिवांना जन्म दिला. कितीतरी साधु–सत्पुरुषांच्या जन्माने या वऱ्हाडी भूमीची कूस धन्य झाली आहे ! पुण्यात्मा श्री गाडगे बाबा याच भूमीतले ! अगदी अलीकडे याच भूमीने राष्ट्रसंत तुकडोजीसारख्या जगदोद्धारक जीवनाचा विश्वक्षितिजावर उदय केला होता.

अमरावती जिल्ह्यातील चांदूर तालुक्यात संत मायबाई समकालीन श्री बगाजी महाराज ज्या मंगरूळ ग्रामी रहात असत. त्याच गावी भांडे नावाच्या कुळात श्री लहानुजींचा जन्म इ. स. १८८० साली फाल्गुन शुद्ध द्वितीयेला झाला. श्री. अभिमानजी भांडे हे त्यांच्या पित्याचे नाव व मातेचे नाव होते भीमाबाई. एकोणिसाव्या

शतकातील सुप्रसिद्ध खग्रास सूर्यग्रहणाच्या समयास श्री लहानुजी अवनीवर अवतरले होते. लहानपणीच ते मातापित्यास मुकले. त्यांचे मामा श्री. बारकाजी ठाकरे हे नागपूर जिल्ह्यातील रिधोरा गावी रहात असत. त्यांचे एक नातलग श्री. ठवळी हे वर्धा जिल्ह्यात आर्वी तालुक्यात टाकरखेड येथे रहात. त्यामुळे आपल्या मामांबरोबर श्री लहानुजी लहानपणीच टाकरखेड्याला आले. तेथे ठाकरे मामा श्री. बापूराव ब्ळीरामजी देशमुख यांची शेतीभाती करून आपला उदरनिर्वाह करीत असत. लहानुजींचे थोडेसे प्राथमिक शिक्षण या टाकरखेड्यातच झाले.

टाकरखेड हे वर्धा नदीच्या तीरावर वसलेले एक छोटेसे गाव! पैलतीराला धामंत्री तीर्थ असून तेथे एक मोठे शिवालय आहे! पूर्वी तेथे काशीचे एक महंत श्री इतवारगीर महाराज हे कैक वर्षे रहात असत. लहानगा लहानु त्यांच्याकडे जाऊन पाणी भरणे, मळा राखणे अशी कामे करी. त्याच्या आवडीचेच ते काम होते. मधून मधून काशीकडून आलेला नागे लोकांचा तांडा टाकरखेड मार्गे धामंत्रीला जात असे. लहानग्या लहानूने त्या तांड्याचा तपास लावून पिच्छा पुरविला, आणि एक दिवस यांच्यासमवेत तो तीर्थयात्रेसाठी निघून गेला. त्यांच्याबरोबर त्याला चारोधाम तीर्थयात्रा घडली. सत्संगाचे, साधकीय जीवनाचे एक तप बाहेर घालविल्यावर पुनश्च लहानुजी टाकरखेड्याला आले. टाकरखेडच्या आसपास वरदापात्री ( वर्धा ) विहार करू लागले. राहिली साहिली योगसाधना पुरी करण्यासाठी मग ते अकोला जिल्ह्यातील सस्तीवाडेगाव येथे वनविहार करणाऱ्या योगी लालगीरबुवा यांच्याकडे गेले. श्री लालगीर महाराजांनी एकदा प्रसन्न होऊन त्यांना वैराग्याची दीक्षा दिली. तेथे काही दिवस योगसाधना करून पुनश्च ते टाकरखेड्यास आले. श्रमजीवी जीवनाची त्यांना विलक्षण आवड. ते टाकरखेड्याला आल्यावर गावकऱ्यांच्या शेताची राखण करण्याचे काम आपणहून व आवडीने करीत. त्यांचे बावळेपण पाहून त्यांचा आध्यात्मिक अधिकार मात्र लोकांच्या त्यावेळी लक्षात आला नाही.

१९३२ सालची गोष्ट! टाकरखेड्यात कै. गोविंदराव कडूंच्या माळघरात श्रीसंत मायबाईची एक नाम समाधि आहे. तिचा वार्षिकोत्सव मे महिन्यात असे. कायदेभंगाच्या काळातील एका उत्सवात श्री तुकडोजी महाराजांचे खंजिरी भजन आयोजित करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी गावातील त्या गल्लीतून श्री लहानुजींचा फेरफटका झाला. दोन संतांची दृष्टादृष्ट झाली. दोघेही श्रीसंत आडकुजींच्या कृपाप्रसादाने वाढलेले. राष्ट्रसंतांपेक्षा लहानुजी वयाने सुमारे पंचवीस वर्षांनी मोठे. लहानुजी बाह्यात्कारी जरी ' अणोरणीयान ' भासले तरी

महीयाम्' आहेत हे राष्ट्रसंतांनी त्या दिवशी प्रथमच गावकऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांचा यथार्थ परिचय त्यांनी टाकरखेडनिवासीयांना करून दिला. पुढे स्वेच्छेने श्री लहानुजी महाराज गोविंदराव कडूंच्या गोठ्यात राहू लागले. श्री गोविंदराव हेच त्यांचे आद्यनिष्ठ भक्त. तत्पूर्वी त्यांच्या दर्शनार्थ त्यांचे समवयस्क मित्र वरखेडचे श्री. दौलतराव बेलूरकर, श्री. शेषराव बोके व आर्वीचे अध्यापक 'सत्यमार्ग प्रदीप' कार कै. बाळकृष्णपंत पावळे हे जात असत. लहानुजींची साधकावस्था या सर्वांनी पाहिली होती.

त्यांचे गोठ्यातील जीवन कसलेल्या कास्तकाराचे असे. त्यांना श्री. कडूंच्या घरचे भोजनाचे ताट येई. जेवण झाल्यावर आपले ताट ते स्वतःच स्वच्छ करीत. एकदा दोन्ही हात दोराने घट्ट बांधून ठेवून येऊन त्यांनी अलौकिकपणे जेवण केल्याची गोष्ट सर्वांनी अनुभवली आहे. त्यांची वाणी अस्सल वऱ्हाडी होती. त्यांचा वेषहि वऱ्हाडी कास्तकारासारखा (शेतकऱ्यासारखा) असे. धोतर, पांढरा सदरा व पांढरी टोपी ते वापरीत. त्यांच्या या सर्वसामान्य दर्शनाने प्रथमतः त्यांची अलौकिकता येणाऱ्या लोकांना मुळीच जाणवत नसे. एखाद्या श्रमशील कृषकाच्या सवयीच त्यांना अखेरपर्यंत होत्या.

श्री लहानुजी महाराजांना सद्गुरु कृपाप्रसाद लाभला तो वरखेडनिवासी शिवस्वरूप श्री आडकोजीनाथांचा. त्यांची कायाक्लेशात्मक यौगिक साधना अत्यंत कठोर होती. 'शिवस्वरोदय' हे त्यांच्या साधनेचे नाव. आपल्या सद्गुरूंना ते नेहमी म्हणायचे की, मला आपणासारखे करून टाका. त्यांचा हा हट्टच असे आपल्या गुरुदेवाजवळ. आणि मग परब्रह्मस्वरूप आडकोजींनी एकदा त्यांना आशीर्वाद दिला. श्री लहानुजींच्या गुणवर्णनपर केलेल्या 'स्तवनामृत' ग्रंथांत याचे वर्णन आहे.

म्हणती तुम्हासमान मज करा। तूं मोक्षसुखाचा दातारा।
न सोडी हा चरण सहारा। कृपा प्राप्त होईपर्यंत ॥
दिले समर्थांनी वरदान। होशील तूं मजसमान।
दिगंती होईल तुझा मान। तुज पुजतील ईश्वरभावें ॥
भावी संतमंडळांत तूं मार्तंड। तुझे जीवन होईल उदंड।
कार्यहि घडेल फार। गगनाहुनी थोर ते ॥

सद्धर्माचा प्रसार नि प्रचार करण्याचे श्री लहानुजींचे कार्य टाकरखेड्यात बसूनच त्यांनी अखेरपर्यंत केले. त्यांचा आध्यात्मिक अधिकार आगळाच होता. ते

रात्रंदिवस स्वतःला संबोधून 'काय रे लायन्या...' असे म्हणत बोलत. भिंतीकडे तोंड करून ते बसलेले लोकांना आढळत. पण त्यांचा स्वरसृष्टीतला विहार अखंड गतिमान होता. त्यांच्या दर्शनाला विदर्भ, नागपूर व महाराष्ट्रातीलही अनेक लोक जात. त्यांच्या दर्शनाने आणि प्रसादाने कितीतरी लोकांच्या आधिव्याधि दूर झाल्या आहेत.

श्री लहानुजींनी आपल्या ९० वर्षांच्या दीर्घ आयुष्यात अनेकांचे दुःसाध्य रोग केवळ तीर्थ आणि अंगाऱ्याने बरे केले. वर्धा नदीच्या पुरापासून गावांना वाचविले, अनेकांच्या मनोव्यथा कृपाकटाक्षाने नाहीशा केल्या. जीवनातील पुढील होणाऱ्या घटना दाखवुन लोकांना वेळीच सावध केले. आपल्या हातातील सोट्याने मार देऊन अनेकांना सन्मार्गाला लावले. दर्शनासाठी आलेल्या माणसाचे मनोगत ते केवळ त्या माणसाच्या पडलेल्या छायाकृतीवरून ओळखीत. रोकड्या शब्दात ते त्याला जे उत्तर देत ते ज्याचे त्यालाच कळे. जमलेल्या इतर दर्शनार्थीसाठी महाराजांचे बोलणे म्हणजे फक्त गूढच रहात असे. आलेल्या माणसांनी कोणताहि प्रश्न न विचारता त्यांच्या अंतर्यामीच्या शंकांची आणि संकल्पांची रूपे श्रीलहानुजींना अगदी स्वच्छ दिसत असली पाहिजेत. कारण त्यांना अनुसरूनच त्यांचे मार्गदर्शन सहजपणे लोकांना लाभत असे.

जेव्हा टाकरखेडला येणाऱ्या लोकांची संख्या खूपच वाढली तेव्हा वंदनीय राष्ट्रसंतांनी आपल्या गुरुबंधूच्या दर्शनार्थ येणाऱ्या लोकांची सोय व्हावी म्हणून श्री लहानुजी महाराज रहात होते त्या ठिकाणी एक आश्रमवजा बांधकाम १९६४ त करवून घेतले. आलेल्या भाविकांसाठी एक धर्मशाळा, श्री महाराजांसाठी स्वतंत्र दोन खोल्या तेथे बांधल्या गेल्या. सेवकांनी एका खोलीत आपले कार्यालय थाटले. 'गुरुप्रसाद' नावाचा महाराजांच्या स्तुतिपर कवनांचा संग्रह सेवकांच्या संस्थेने प्रकाशित केला. श्री लहानुजीचे मराठी व हिंदी भाषेत चरित्र प्रसिद्ध झाले. त्यांचा ओवीबद्ध चरित्रग्रंथ वरखेडवासी श्री. रा. मो. बेलूरकरजीने लिहिला. या छोट्याशा आश्रमात सामुदायिक प्रार्थनेचा उपक्रमहि रोज चाले संस्थेच्या मालकीची आज २८ एकर जमीन व सुमारे ८० हजारावर रोकड शिल्लक आहे.

'जगात पिशाच अंतरी शहाणा।
सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो॥'

अशा शब्दांनीच श्रीलहानुजींच्या अवस्थेचे वर्णन करावे लागेल. आध्यात्मिक दृष्टीने त्यांची परंपरा त्यांच्या चरित्रग्रंथात जी दिली आहे ती अशी की–आदिनाथ

चिरंजीव श्री गुरुदत्त महाराज (केदारनाथ) मच्छिंद्रनाथ-गोरखनाथ-गहिनीनाथ निवृत्तिनाथ-ज्ञाननाथ (ज्ञानेश्वर) व याच समाधीमधून मंत्र मिळालेले श्री हैबतबाबा (पंढरीला आज येणाऱ्या दिंडीच्या पद्धतीचे जनक) व नंतर याच माळेत आर्वीच्या संत मायबाई त्यांचे शिष्य श्री आडकुजी महाराज व त्यांचेच अनुगृहीत श्री लहानुजी महाराज.

'जे आपुलिया मार्गा आले ।
ते आचरी विधिगौरवे ॥'

ह्या श्रीज्ञानेशोक्तिप्रमाणे श्री लहानुजी महाराजांनी आपले सेवामय जीवनपुष्प विश्वात्मक श्री गुरुदेवांच्या चरणी भक्तिभावाने समर्पित केले. विदर्भ प्रांतातील वर्धा जिल्ह्यातल्या टाकरखेड नामक एका लहानग्या गावात व आसपास लहानुजी विहरले. धर्मप्रसार-प्रचारासाठी त्यांनी आधुनिक जगातली कोणतीहि पद्धति अंगिकारली नाही. कोणता संप्रदाय अगर संस्था निर्मिली नाही. त्यामुळे त्यांचे नाव पश्चिम महाराष्ट्रात व अन्य प्रांती खूपच अपरिचित राहिले. पण म्हणून काही त्यांच्या कार्याचे महत्त्व सीमित होत नाही—कमी होत नाही.

या संतशक्तीचे एक लोभसवाणे रूप म्हणजे श्री लहानुजीबाबा ! आता त्यांचे ते निरामय जीवन पंचतत्त्वात विलीन झाले ! ते गेले त्यापूर्वीच्या आठवड्यात टाकरखेड्याला त्यांच्या आश्रमासमोर महायज्ञ चालू होता. यज्ञाची पूर्णाहुति होण्या अगोदर एक दोन दिवस ते पुन्हा आपल्या पूर्वीच्या गोठ्याच्या जागेत राहावयास गेले होते. श्रावणी पौर्णिमेला (दि. ६ ऑगस्ट ७१) यज्ञाची पूर्णाहुति होताच त्यांनी सर्वांसमक्ष प्राणनिरोधन केले, आणि आपल्या सुदीर्घ जीवनाची पौर्णिमा साधली. शेवटचा दिवस त्यांनी असा गोड केला. त्यांच्या निर्वाणाची बातमी नागपूर नभोवाणीने त्वरित प्रसारित केली.

हजारो भाविकांची श्रीक्षेत्र टाकरखेड येथे गर्दी उसळली. दुसऱ्या दिवशी त्यांची रथात बसवून अंत्ययात्रा काढण्यात आली. वसिष्ठा (वर्धा) नदीच्या पावन तटाकी ती महायात्रा विसर्जित झाली. मारवाडीचे संत भानुदास महाराज, पठूरचे संत आका महाराज, सालबर्डीचे वयोवृद्ध संत मारुती महाराज, शिरसगावचे संत गजानन महाराज, वरखेडवासी संत सत्यबाबा, शेगावपलीकडील काटेल मठाधिपति संत गुलाबबाबा आदि संतमंडळी त्या महायात्रेत उपस्थित होती. सर्वांसमक्ष श्री. लहानुजीबाबांचा आसनस्थ देह त्यांच्या कुटीसमोरील यज्ञकुंडात स्थापित करण्यात आला व मग त्यावर पायऱ्या पायऱ्यांनी समाधि बांधून पूर्ण झाली.

महाराज गेल्यापासून प्रतिवर्षी त्यांच्या पुण्यतिथीला भक्तांचा मेळावा भरत असतो. पूर्वीप्रमाणेच प्रतिवर्षी महाशिवरात्रीपूर्वी सप्ताह साजरा होत असतो.

# सुविद्य साईभक्त—डॉ. मधुसूदन बाबरे

• साईनंद



शिर्डीतील श्रीसाईबाबांच्या चावडीशी श्री. दामोदर घनःशाम उर्फ अण्णासाहेब बाबरे चिंचणीकर यांचा अगदी निकटचा संबंध आहे. या बाबरे घराण्यावर श्रीबाबांची सदैव कृपादृष्टी आहे असे म्हणावयास हरकत नाही. अण्णासाहेबांनी तर आपल्या उभ्या हयातीत चिंचणी–तारापूरला बाबांचे एक मंदिरच बांधलेले आहे

अशा या बाबरे कुटुंबातीलच एक सुविद्य भक्त आज आपल्यात आहेत. त्यांचे नाव आहे डॉ. मधुसूदन सखाराम बाबरे. अण्णासाहेब हे यांचे चुलते होत. डॉ. बाबरे हे लहानपणी बाबांचे जवळून दर्शन घेतलेले एक भक्त आहेत. आज या वयात बाबांच्या बद्दल बोलताना ते अगदी तळमळून कळवळून नि तन्मयतेने बोलतात की त्यांच्या-पुढून ऐकणाऱ्याला उठवतच नाही.

डॉ. मधुसूदन बाबरे यांचा जन्म ७ एप्रिल १९१४ रोजी चिंचणी जि. ठाणे येथे झाला. त्यांचे वडील श्री. सखारामपंत ठाणे कलेक्टरांचे शिरस्तेदार होते. १ ऑगस्ट १९२० रोजी ते कालवश झाले. मधुसूदन यांच्या आईचे नाव अहिल्या. त्या १९७४ साली परलोकी गेल्या. आपल्या चुलत मावशीचे यजमान बांद्र्याचे साई-भक्त श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे व चुलते अण्णासाहेब यांचेबरोबर जाऊन छोट्या मधुसूदननी बाबांचे लहानपणी प्रथम दर्शन घेतले, तेव्हापासून ते जे शिर्डीला साईभक्त बनले ते अगदी आज मितीपर्यंत.

मधुसूदन यांचे प्राथमिकपासून तो मॅट्रीकपर्यंचे सारे शिक्षण चिंचणीच्याच कानजी धरमसी हायस्कूलमधे झाले. १९३३ साली ते मॅट्रीक झाले. आपल्या शालेय कारकिर्दीत त्यांनी आपला वर्गातला पहिला क्रमांक कधीच सोडला नाही. मॅट्रिक-नंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी मुंबईतील विल्सन कॉलेजात नाव दाखल केले. १९३५ साली इंटर सायन्स तेथून झाल्यावर नॅशनल मेडिकल कॉलेजात त्यांनी डॉक्टरी शिक्षणासाठी नाव दाखल केले, व १९३७ साली ते एल. सी. पी. एस. डॉक्टर झाले. १९३७ ते ३८ हा काळ त्यांनी मुंबई नगरपालीकेचे डॉक्टर म्हणून नोकरी केली. पुढे वॉलिस फ्लोअर मिलचे ते १९३८ ते १९४३ हा काळ मेडीकल ऑफीसर होते. नंतर त्यांनी १९४३ साली डोंगरीला आपला स्वतंत्र दवाखाना थाटला व ते तिथे स्वतंत्र प्रॅक्टिस करू लागले, ते अगदी १९७६ सालापर्यंत.

डॉ. मधुसूदन यांचा विवाह १९४५ साली झाला. त्यांच्या पत्नी विरारच्या सर्वाश्रमीच्या कु. लीला जोशी. बाबरे दांपत्याला एक पुत्र व दोन सुकन्या आहेत. चिरंजीव डॉ. प्रफुल्ल सध्या आपल्या वडीलांचाच डोंगरी येथला दवाखाना बघतात. कन्या डॉ. सौ. कल्पना पुरोहित या नावाने मालेगावला वावरत आहे. त्यांचे पतीपण डॉक्टर आहेत. दुसरी कन्या स्मिता पदवीधर असून आकाशवाणी व दूरदर्शनवर विविध कार्यक्रमातून रसिकांना दर्शन घडवित असते.

वयाच्या आठव्या वर्षी डॉ. बाबरेना गोरेगावच्या विनायक बुवा मसूरकरांनी 'दासबोध' पठणाची दीक्षा दिली. पुढे ज्ञानेश्वरी, भगवद्गीता यांची त्यांनी पारायणे केली अनेक संत पुरुषांची त्यांना दर्शने जवळून घडली. पावसच्या श्री स्वामी स्वरूपानंदांनी त्यांना २२–५–७२ रोजी अकल्पितपणे सोहम्‌ची दीक्षा दिली. श्री

साईबाबांची निष्ठापूर्वक भक्ती ते गेली ६५ वर्षे करीत आहेत. बाबांच्या नामस्मरणाशिवाय त्यांचे कोणतेच कार्याचे पान हालत नाही. ते स्वतः डॉक्टर आहेत. आजवर इतरांना औषधे ते देत आले आहेत पण स्वतःवर जर कधी काळी औषध घेण्याचा प्रसंग आला तर त्यांचे औषध आहे श्री बाबांची उदी. त्यांच्या डोळयात सध्या मोती बिंदू आहे. पण ते शस्त्रक्रिया करीत नाहीत. बाटलीत उदी भरून त्यात पाणी घालून थेंब-नळीच्या सहाय्याने ते अधूनमधून डोळयात सोडतात त्यामुळे त्यांना दिसते व डोळयांनाही आराम वाटतो असा स्वानुभव ते सांगतात. रोज भल्या पहाटे उठून बाबांची यथाविधी पूजा, अभिषेक, पोथी, स्तोत्र पठण ते नियमाने करतात आणि मगच इतर कार्याला कामकाजाला ते लागतात. बाबांना वंदन केल्याशिवाय ते कधीच घराबाहेर पडत नाहीत. बाबांविषयींच्या अनेक चित्तथरारक आठवणी त्यांच्यापाशी आहेत. साईबाबा हेच आपले आराध्य दैवत आहे तेच आमचे त्राता आहेत, उद्गाते आहेत असे डॉ. बावरेसाहेब मनापासून सांगतात आणि बाबांची अगदी अगदी आठवण झाली की कासाविस होऊन शिरडीला ते जाऊन बाबांचे डोळे भरून दर्शन घेऊन परत येतात. डॉ. बावरेंना सहा बंधू. सर्वात वडील बंधू रामरावजी ठाण्याला वकील असून त्यांचे वय आज ८५ वर्षांचे आहे व हे सर्व बंधू पण साईभक्त आहेत.


॥ श्रीसाई प्रसन्न ॥

अकल्पीत द्रव्यप्राप्ती सौभाग्य प्राप्ती धन धान्यादी
वृद्धी व सुखैश्वर्य प्राप्तीसाठी

## श्री वरदलक्ष्मी षोडशोपचार पूजा व व्रतकथा (प्राकृत)


लेखक : ह. भ. प. आठल्ये शास्त्री

मुल्य २-०० रुपये

: प्रकाशक :
श्री. रघुनाथ गो. वेंगुर्लेकर
साडविलकर बुक डेपो,
७०/८० जैन स्थानक, मुं. नं. १२

प्रमुख विक्रेता
तुकाराम बुक डेपो,
माधव बाग मुं. नं. ४

# श्री साईबाबांची चावडी



भक्तांसाठी नवी माहितीपूर्ण लेखमाला...४

# * श्रीसाईबाबांची चावडी *


—सदानंद चेंदवणकर,
कार्यकारी संपादक 'श्रीसाईलीला'
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी


● खेडेगावात ठिकठिकाणी चावडी ही असतेच असते. गावातली मंडळी चावडीवर चकाट्या पिटायला येतात. गावातील सर्व कुटाळकी कळते ती या चावडीवरच. पण शिरडीतील चावडी ही अशा प्रकारची नव्हती व नाही. शिरडीतील मुख्य समाधीमंदिराचे पूर्वेस मंदिरापासुन जेमतेम शंभर एक पावलावर ही वास्तू आहे. विशेषतः द्वारकामाईपासून पूर्वेस जवळच हे स्थान आहे. श्रीसाईबाबा आपल्या ह्यातीत एक दिवसाआड येथे निद्रासुख अनुभवीत असत. शिर्डीत श्रींच्या वास्तव्याने पुनीत झालेली जी स्थाने आहेत त्यात श्रीबाबांची चावडी हे एक महत्वाचे स्थान आहे. पूर्वी ही चावडी पडकी इमारत होती. तिथे खाचखळगे होते. केरकचरा खूप होता. पण आता जमिनीपासुन चार फूट उंचावर ही इमारत आहे. या इमारतीत जाण्यासाठी मध्यभागी चार पायऱ्या लागतात. पायऱ्या चढून गेल्यावर डाव्या व उजव्या अंगास पाच फूट रुंदीचा व सुमारे १६ फूट लांबीचा ओटा असून मागच्या भागात चावडीची मुख्य इमारत आहे. पायऱ्यांच्या उजवीकडील भागास दोन दरवाजे असून डाव्या अंगाकडील भागात दोन गजांच्या खिडक्या आहेत. वरच्या बाजूस गच्ची आहे. पायऱ्यांसमोर चावडीचे मुख्य प्रवेशद्वार आहे व ते दक्षिणाभिमुख आहे.

या चावडीचे अलिकडच्या काळात नूतनीकरण झालेले आहे. चावडीच्या प्रवेशद्वारावर पाहिले तर लक्ष्मीबाई दामोदर बाबरे अशी अक्षरे दिसून येतात. चावडीशी या नावाचा घनिष्ट संबंध जोडला जातो व त्याची रंजककथा पण अशी आहे—

बाबांच्या वेळेस जे ३२ साईभक्त व सेवक होते त्यात ठाणे जिल्ह्यातील चिंचणी (तारापूर) येथील साईभक्त कै. दामोदर घनःश्याम बाबरे (ज्यांना शिर्डीत अण्णा चिंचणीकर म्हणून संबोधिले जात होते) हे होते. कै. अण्णा बाबरे चिंचणीकर व त्यांच्या धर्मपत्नी लक्ष्मीबाई ह्या दांपत्याने बाबांबद्दल गहन त्यांनी कित्येक

चिंचणीकर व त्यांचे कुटुंब सेवा करीत असता शेजारीच कै. माधवराव देशपांडे उर्फ शाम्या व कै. काकासाहेब दिक्षीत हे होते. माधवरावांनी बाबांना सांगितले की, 'देवा, हा काय, तुझा खेळ आहे ! दूरदूरचे भक्त संतति अपेक्षेने तुझ्याकडे येतात. त्यांची मनीषा तू पूर्ण करतोस. पण अण्णा व लक्ष्मीबाई इतकी वर्षे तुझी सेवा करूनही तू त्यांना संतति का देत नाहीस ?' त्यावर बाबा स्मित करून उत्तरले. 'शाम्या, तू लहान आहेस. मी कुणी मागितल्यानंतर दिले नाही असे झाले काय ? ह्या दांपत्यांनी मजजवळ काही मागितले नाही. म्हणून मी दिले नाही. विचार त्यांना मूल हवे काय ? मी देतो. पण शाम्या त्यांना मी जर मुलगा दिला तर तो अण्णांचे नाव एक पिढीपर्यंत चालवील. मी त्यांचे नाव अजरामर करणार आहे.' वरील बाबांच्या बोलण्याचा अर्थ कुणास कळला नाही. त्यावेळी कै. अण्णांची पन्नाशी उलटून गेली होती. अण्णांचा डहाणूच्या सिव्हील कोर्टात एक शेतकीचा दावा चालू होता. त्या संबंधित अण्णांनी बाबांना विचारले होते. प्रत्येक वेळी, 'अल्ला, तुझे भले करील.' असे बाबा उत्तर देत. हा दावा सतत ३ वर्षे चालू होता. अण्णांच्या तर्फे डहाणूचे प्रसिद्ध वकील कै. अच्युत नारायण खरे हे काम पहात असत. एकदा चेष्टा म्हणून कुणीतरी अण्णांना शिर्डीस पत्र लिहून कळविले की तुम्ही दावा हरलात. हे पत्र घेऊन अण्णा काकासाहेब दीक्षीत यांच्याकडे गेले व उभयता पत्र घेऊन द्वारकामाईत शिरत असतानाच बाबा मोठ्याने गर्जले. 'ह्या येरड्याला विश्वास नाही. फेकून दे पत्र.' पत्रातील मजकूर बाबांनी अंतर्ज्ञानाने जाणला होता. नंतर काही महिन्यांनी कै. खरे वकीलांचे डहाणूहून पत्र आले. त्यात अण्णा खर्चासह दावा जिंकल्याचे व रु. १८०० ची डिक्री झाल्याचे कळविले होते. पुन्हा अण्णा काका दीक्षीतांबरोबर द्वारकामाईत गेले बाबांनी सांगितले 'आता विश्वास पटला ना ?' अण्णांनी ते पत्र बाबांच्या पायावर ठेवले व म्हणाले, 'बाबा, हे तुमचे आहे मला नको.' बाबा म्हणाले, 'वेडया, माझा काय संसार आहे ? तुझे तू घे.' असे बराच वेळ चालले होते. त्यावेळी कै. काका दीक्षीतांनी तडजोड काढली की, अण्णांचे हे १८०० रु. घेऊन पडकी असलेली बाबांची चावडी दुरुस्त करून घ्यावी. ह्यास बाबांनी संमती दिली, व म्हणाले, ह्या चावडीला अण्णा व लक्ष्मीआईचे नाव द्या.' त्याप्रमाणे ते नाव दिले, व ते नाव कै. लक्ष्मीबाई दामोदर बाबरे, बाबांची चावडी असे कोरलेले असल्याचे आजही आपण वाचू शकता.

कै. अण्णा चिंचणीकर हे आंतरबाह्य साईमय झालेले होते. त्यांना श्रीबाबांशिवाय दुसरे काही दिसत नसे. अशी गुरु भक्तात अभेद भक्ती निर्माण झाली होती. त्या गुरुभक्तीमुळेच त्यांनी आपली स्थावर-जंगम सर्व इस्टेट मोठ्या प्रेमाने श्रींच्या खर्चास शिर्डी संस्थानास अर्पण केली आहे. या मासिकाच्या शके १८४५ च्या १२ व्या अंकात त्यांचे मृत्यूपत्राची नक्कल छापली आहे.

येथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की शिर्डीस बाबांच्या समाधी मंदिरा समोर जो सभामंडप बांधला आहे त्यास झालेल्या रु. ६५००० खर्चापैकी 'अण्णा चिंचणीकर ट्रस्ट' व 'कै. रासने ट्रस्ट'मधून मोठी रक्कम खर्ची पड-ल्याची नोंद सभामंडपाच्या महाद्वाराच्या उजव्या हातावर लावलेल्या शिला लेखा-वरून दिसून येईल. कै. अण्णा दाभोळकर कृत श्रीसाई सत्चरित्रात अण्णा बाबरे यांचा उल्लेख अध्याय २४ मध्ये आहे.

कै. अण्णा बाबरे यांचे नाव अजरामर करण्याची बाबांची भविष्यवाणी खरी ठरल्याचे आज चावडी दर्शनाने आपल्याला दिसून येते.

एका लाकडी पार्टीशनने चावडीचे दोन भाग पडतात. उजवीकडील भागात पार्टीशनला लागून ओट्याकडील पहिल्या दरवाजासमोरच एक मोठा छानदार देव्हारा आहे. या देव्हाऱ्यात मऊ कोचासारख्या सुशोभित आसनावर श्रीबाबांची बसलेल्या स्थितीतली एक भव्य तसबिर ठेवण्यात आलेली आहे. या तसबिरीपुढे बाबांच्या पादुकाही आहेत. जवळच बाजूला एका काचेच्या कपाटात एक नंदादीप तेवत असतो. या देव्हाऱ्याचे मागील बाजूस मोठाल्या आरशाच्या तसबिरी आहेत. चावडीतील उजव्या हाताच्या भिंतीसही श्री बाबांची एक भव्य तैलचित्राची तसबिर असून ती नवसारीच्या अंबारामनामक चित्रकाराकडून ११-१-१९७३ रोजी भेटीदाखल आलेली आहे. चावडीत आढ्याला पांढऱ्या व हिरव्या हंड्या व अनेक देवदेवतांच्या चित्र तसबिरी व्यवस्थित लावलेल्या आहेत. या तसबिरी व हंड्या बाबांच्या वेळे-पासूनच्या आहेत.

पार्टीशनच्या ज्या भागात हे सारे आहे तिथे बाबा एक दिवस आड करून झोपत असत. त्यावेळी अन्य कुणालाही चावडीत थांबण्याची किंवा त्यांचेबरोबर झोपण्याची अनुज्ञा नसे. येथे बाबा झोपी जाण्यापूर्वी ६४ वस्त्राच्या घड्या करून त्यावर झोपी जात असत. बाबा हे ब्रम्हचारी असल्याने या पार्टीशनपासूनच्या आतील भागात महिलांना येण्यास बंदी आहे. ही प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे.

पार्टीशनबाहेरच्या चावडीच्या भागात पश्चिम भिंतीजवळ एक दोन रबरी चाकांची पांढऱ्या रंगाची खुर्ची व एक लाकडी पलंग ठेवण्यात आलेला आहे. ही खुर्ची एका भक्ताने बाबांना वृद्धापकाळात दिली होती. जवळच्या लाकडी पलंगावर बाबांना अखेरचे स्नान घालण्यात आले होते. याच दालनात आढ्याला टांगलेली

बाबा असताना चावडीत बाबांची आरती होत असे. बाबा चिलीम प्याले की सर्वांना उदीचा प्रसाद मिळे व मग सर्व भक्तगण आपापल्या बिऱ्हाडी जात. आजही बाबांची पालखी दर गुरुवारी रात्री ९ वा. मशिदमाईतून निघून चावडीत वाजत गाजत जाते व तिथे आरती व चिलीम शिलगावणे हा समारंभ झाल्यावर पालखी समाधिमंदिरात येते व तिथे शेजारती होते तोवर रात्रीचे दहा वाजतात.

श्रीसाईबाबा शिरडीस कायमचे येऊन रहाण्यापूर्वीही काही काळ शिरडीत होते. त्यावेळी ते कडुनिंबाच्या झाडाखाली बसलेले अनेकांना दिसून आले होते. गुरुस्थानासंबंधी बोलताना एकदा बाबा म्हणाले होते की, मी येथे बसून बारा वर्षे तप केले आहे. यासर्व गोष्टी विचारात घेऊन आजचे वयोवृद्ध साईभक्त श्रीस्वामी शरणानंदजी यांनी ' श्रीसाई दि सुपरमॅन ' या आपल्या आंग्ल ग्रंथात पुढील विचार प्रकट केले आहेत. त्यांच्यामते पूर्वी चावडी ते गुरुस्थान असा एखादा भुयारी रस्ता असावा. चावडीच्या पार्टीशनच्या आतल्या ज्या भागात बाबा झोपत असत तेथून निंबवृक्षाखाली असलेल्या गुहेत बाबा जात असावेत व तेथे आपली तपःसाधना करीत असावेत. यामुळेच की काय १२ वर्षे तप या ठिकाणी करीत असताना ते कुणाच्याही दृष्टीस पडले नाहीत.

चावडीत सकाळ-सायंकाळी येथे भक्तमंडळी येऊन बाबांची भजने म्हणतात. या चावडीची व्यवस्थापण श्री. विठ्ठलराव बागवे यांचेकडेच आहे. चावडीची देखमाल तिथे असलेले श्री शिवनेस बाबा हे पण करतात. ते आज अनेक वर्षे तिथे आहेत व निरलसपणे ते बाबांची सेवा करतात.

★

## श्री. रमेश डी. चव्हाण यांच्या बालकथासंग्रहाची चौथी आवृत्ती

श्री साईलीलाचे लेखक-कवी श्री. रमेश डी. चव्हाण यांच्या "राणी रूपमती" ह्या बालकथा संग्रहाची चौथी आवृत्ती दिलीपराज प्रकाशन पुणे यांनी मे १९८१ मध्ये प्रकाशित केली. याच प्रकाशनाने श्री. चव्हाण यांचे ' आटपाट नगर ' हे सर्वांगसुंदर पुस्तकसुद्धा प्रकाशित केले आहे.

# श्रीसाई साक्षात्कारी दिव्यावतार

—श्री. बाळकृष्ण अ. देसाई
भांगरवाडी, लोनावळे

Tell me not in mournful numbers,
Life is but an empty dream,

'असार जीवित केवळ माया। रडगाणे हे गाऊ नका॥' इंग्लीश कवि लाँगफेलो यांच्या 'Psalm of Life' ह्या काव्यातील ह्या ओळी आहेत.

जीवन असार नाही. त्यात पुष्कळच सार आहे. कर्तृत्वाने, प्रेमाने, भावभक्ति-अन् देशभक्तीने भरून काढण्यासाठी देवाने दिलेले ते एक वरदान आहे.

साईबाबांनी इतर संतांप्रमाणे अभंग, आर्या, ओव्या, श्लोक किंवा उपदेशपर वाङ्मय निर्माण केले नाही. मात्र त्यांनी चमत्कार पुष्कळच केले-केवळ यावरूनच त्यांची योग्यता मोजता येणार नाही. सिद्धि प्राप्त झालेला कुणीही सन्त किंवा योगाभ्यासी आपल्या ज्ञानाच्या जोरावर चमत्कार करू शकतो. बाबांनी हे तर केलेच, शिवाय शिष्य सांप्रदाय किंवा बुवाबाजीकडे न वळता, भिन्न धर्मियातील परस्परांविषयीच्या द्वेष भावना नष्ट करण्यासाठी अभिनव नि क्रांतिकारी मार्ग शोधून काढला अन् सुशिक्षितांना हाताशी धरून तो रूढ करून दाखविला. यातच त्यांचे देवपण होते, हे कुणीही मान्य करील.

त्यांचा निवास शिरडीतील मोडकळीस आलेली एक मशीद ती होती हिन्दूंच्या वस्तीत. तियली जागा साफ करून त्यांनी तिथे आपले कायम वास्तव्य केले. त्यानंतर त्यांनी स्वतःती मशीद चांगली बांधून काढली. यामुळे मुसलमान त्यांना मान देऊ लागले. बहुकडे हिन्दु वस्ती त्यामुळे रोजच त्यांचा त्यांना सहवास घडत गेला. हळू हळू हिन्दू, मुसलमान त्यांच्या भजनी लागले. याचा परिणाम त्यांच्यातील जातीय वैमनस्याची धार बोथट होण्यात झाला. 'द्वारकामाईत' रोजच पूजाअर्चा, भजन-कीर्तन होऊ लागली. तसेच आत मशिदीत मुसलमानांच्या प्रार्थना होऊ लागल्या. ह्या गोष्टीला कुणीच विरोध केला नाही.

सर्व धर्मीयात एकेश्वरवाद निर्मिण्याचा त्यांनी आपल्या अवतार कार्यात कसोशीने प्रयत्न केला. त्यांचे भक्त जसे हिन्दु-मुसलमान तसे पारशी, खिश्चन, बौद्ध, जैन, शीखही होते. ह्या सर्व धर्मियांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी प्रथम फळे वाटण्याचा क्रम सुरू केला. त्यानंतर हळूहळू स्वतः स्वयंपाक करून ते त्यांना एकत्र बसवून भोजन देऊ लागले. लोक आनंदाने बाबांचा तो प्रसाद मानून ग्रहण करू लागले.

बाबा म्हणत, 'आपण एकाच परमेश्वराची लेकरे. भेदा-भेद मानवनिर्मित आहे. म्हणून आपणच तो मोडून काढला पाहिजे.' ह्या सर्व खाणेपिणे नि भजन, कीर्तन, प्रार्थनादि गोष्टी मशिदीत होत. पण एकाही मुसलमानाने त्याविरुद्ध कधीच तक्रार केली नाही. कारण सर्वांनाच कळून चुकले होते की, बाबा साधे संत नसून त्यांच्यापाशी अफाट दैवी सामर्थ्य आहे. अन् यासाठीच आपण कोण हे कुणालाच समजू नये म्हणून नेहमी पाहातो तो वेष त्यांनी कायम ठेवला होता. जसे ते भजन-कीर्तनात मग्न होत, तसे फकिरांना बोलावून त्यांच्याकडून मशिदीत नमाजही पढवून घेत.

याप्रकारे हिंदूच्या सोवळ्या ओवळ्याला नि मुस्लीम मौलवींच्या कर्मठ धर्माचरणाला पायबंद घालून त्यांनी सान्यांना मशिदीत एकाच पंगतीत बसवून प्रसाद म्हणून आग्रहपूर्वक जेवणे घातली. अशी सहभोजने वारंवार होऊ लागली. मात्र प्रत्येकवेळी लोकांचा आपल्यावरील विश्वास दृढ होण्यासाठी चमत्कारात त्या सर्वांना गुंतवून ठेवले होते.

त्यांचे भक्त डॉक्टर, मामलेदार, जज्ज, सॉलीसीटर्स, वकील, लेखक तसेच लहान मोठे अमलदार अशी शिक्षीत नि पुढारलेली मंडळी होती. त्यांचा हेतूच असा होता की, अशा लोकात समतेचे बीज पेरले की, ते वाया न जाता उलट अधिक जोमाने फोफावेल.

अशिक्षीत समाज रूढीप्रिय-पुराणप्रिय असतो. त्यांच्यावर अशा गोष्टींच परिणाम व्हायला फार वेळ लागतो. शिवाय अशिक्षितपणामुळे समाजावर त्यांचे वजन नसते. ही समाजाची नाडी बाबांनी स्वतःच्या हाती ठेवून समतावाद, देशभक्ति नि परस्पर कल्याण साधले होते.

× × ×

विठोबाचा परमभक्त दामाजी हा निजामी मुलखातील मंगळवेढ्याचा. तो निजामाच्या पदरी कमावीसदार होता. धान्यादि महत्वाच्या कोठारांच्या किल्ल्या त्याच्याच हुकुमाने लावल्या-काढल्या जात. मात्र एकाद्या मोठ्या व्यवहाराच्या वेळी निजामाची परवानगी लागे.

एका वर्षी मंगळवेढयाच्या परीसरात भीषण दुष्काळ पडला. लोकांना अन्न पाणी मिळेना. अन्नाच्या करून रोजच शे–दीडशे माणसे मृत्युमुखी पडू लागली. दामाजीला ते भीषण दृश्य पाहावेना. त्याच्या ताब्यात धान्याची कितीतरी कोठारे भरगच्च भरलेली होती. पण त्यातील धान्याच्या वाटपाला निजामाची परवानगी हवी होती. दामाजीने जासुदामार्फत निजामाला सारी परिस्थिति कळविली. आठवडा लोटला. तरी जासूद नाही की, निजामाचे उत्तर नाही. इकडे मात्र रोजच मृत्यूचा आकडा वाढतच होता. शेवटी दामाजीला उघड्या डोळ्यांनी ते भयानक दृश्य नि करुण किंकाळ्या कानानी ऐकवेतना. त्याने विठ्ठलाचे नाव घेऊन त्या हद्दीतील सारी कोठारे उघडून टाकली, नि लोकांनी नेववेल तेवढे धान्य नेऊन जीव वाचवावा असे फर्मान काढले.

लोकांच्या कानी हे फर्मान जाताच त्यांनी सारी कोठारे लुटून अक्षरशः धुवून काढली. काही चुगलखोरांनी ताबडतोब ही बातमी निजामाच्या कानावर घातली. निजाम संतापाने लालबुंद झाला. नि त्याने दामाजीला असेल त्या स्थितीत पकडून आणण्याचा हुकूम सोडला.

हुकमाचे बंदे निघाले. पाहाणाराला ती एक जत्रेसारखी गर्दी दिसली दामाजीने गुप्तरीतीने पळून जाऊ नये म्हणून मंगळवेढयातील दामाजीच्या घराभोवती सैन्याने कडे उभारले.

भर दुपारची वेळ होती ती. पांडुरंगाला नैवेद्य दाखवून दामाजी जेवायला पाटावर बसला. पहिला घास उचलणार तोच ' उस हरामजादेको गिरफदार करो ! ' असा बाहेर चाललेला गलका त्याच्या कानावर आला. हातातला घास ताटात ठेवून दामाजी उठून बाहेर आला मात्र, निजामाच्या लोकांनी त्याला गिरफदार केले. त्यावेळी त्याच्या अंगावर नेसलेल्या धोतराशिवाय दुसरे वस्त्र नव्हते. तशा त्या उघड्या अंगाने शिपायांनी त्याला निजामापुढे आणून उभे केले.

दामाजीने खाविंदाच्या हुकुमाविरुद्ध वर्तन केल्याचे कबूल केले. पण ' मी केले ते स्वार्थासाठी नसून प्रजेचे प्राण वाचविण्यासाठी ! म्हणून खाविंदानी एक वेळ मला क्षमा करावी !

दामाजीने दयेची याचना केली. पण ती ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत निजाम कुठे होता ! त्याने लुटलेल्या सर्व धान्याचे पैसे मोज. तेव्हाच तुझी सुटका होईल असे निक्षून ठणकावले. नाहीपेक्षा जन्मभर अंधारकोठडी भोग !

दामाजी एकनिष्ठ नोकर. एवढ्या धान्याचे पैसे मोजण्याइतपत त्याची मिळकत ती काय होती ! म्हणून निमूट शिक्षा भोगण्यावाचून अन्य गत्यंतरच नव्हते त्याला ! त्याने मनात पांडुरंगाचा धावा करीत म्हटलं, 'सकल जगाचा तूचि एक त्राता। ठेविला चरणी तुझ्या प्रभु माथा ॥'

अन् मनात अशी त्याची विनवणी चालू असता काय चमत्कार घडला ! प्रत्यक्ष विठूराया महाराचे रूप घेऊन नि पैशांची पोती डोकी-पाठीवर लादून निजामापुढं येऊन उभा राहिला.

'कोण तू ?' निजामाचा प्रश्न. 'मी इठू महार !' 'कोण गावचा ?'

'मंगळ वेढ्याचा !' 'पोत्यात काय आहे ?' 'उघडूनशान पाहा साव.' हे धान्याचे पैसे हायती पैसे ! मोजून घ्या बिगी बिगी नि मस पावती लिवून देऊन मोकलं करा चट्‌दिसी !'

दामाजीला विठुरायाची किमया कळून चुकली नि मनात त्याने कितीतरी वेळा विठ्ठलाचे गुणगान केले. 'देवा, माझ्यासाठी तुम्ही महार झालात नि माझी अब्रू राखलीत ! काय केलेत तुम्ही हे !'

निजामही आश्चर्याने थक्क झाला. पैसे घेऊन दामाजीला त्याने मोकळे करताच विठू तिथून जो निघाला, तो क्षणात कुठं गेला, हे कुणालाच कळलंदेखील नाही. साऱ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला. अशी असते काळजी देवाला त्याच्या भक्ताची.

साईबाबा अवतारी महात्मा होते. त्यांनीही अशीच आपल्या भक्तावरी किमया केली, ती ही—

बाळा नेवासकर पति-पत्नी साईबाबांची एकनिष्ठ भक्त. तो निधन पावल्यावर त्याच्या प्रथम श्राद्धदिनी त्याच्या सुनेने सासूबाईंच्या आज्ञेने आजूबाजूच्या काही ठराविक लोकांना जेवणाचे आमंत्रण केले, अन् त्याप्रमाणे स्वयंपाक तयार झाला. पण बाळा नेवासकरावरील प्रेमामुळे आमंत्रितापेक्षा कितीतरी अधिक माणसे गोळा झाली. तो लोकांचा लोंढा पाहून सून गोंधळून गेली. घरात दाणागोटा बेताचाच होता. स्वयंपाक तर आधीच तयार झालेला. आता काय करावं ह्या विचारात सून असता तिच्या सासने हाक मारून म्हटले '[illegible]

काहीच कारण नाही बघ! आपली सारी काळजी बाबांना! तेच अडचण दूर करायला समर्थ आहेत! जा, अगोदर बाबांच्या उदीची डबी आण, अन् तयार असलेल्या स्वयंपाकाच्या भांड्यात थोडथोडी घाल. त्यावर फडके घालून भांडी झाकून ठेव, नि पाने वाढताना जशी गरज भासेल, तेवढा वेळ झाकण बाजूला करून हवा तेवढा पदार्थ काढून घे! मात्र भांडे झाकल्याशिवाय ठेवू नको! जा, लाग कामाला!'

अन् काय आश्चर्य! माणसं अंदाजाहून तिपटीने जास्त आली असूनही सर्वांना यथेच्छ वाढूनही भांडी तशीच भरलेली! अशाप्रकारे दामाजीची विठू-रायाने जशी भीति घालविली, तशीच बाबांनी आपल्या प्रिय भक्त बाळाच्या सुनेची भीति दूर केली.

बाबा, तुमचे अवतार कार्य भव्य दिव्य घटनांनी भरलेले आहे. समाजातील धार्मिक खुळेपणा गाडण्यासाठी तुम्ही सहभोजनाचा कार्यक्रम आखलात. स्वतःच्या हातानी स्वयंपाक करून समाजातील सर्व थरातील भिन्न धर्मियांना प्रीति-भोजन घातलेत, अन माणुसकीची ज्योत त्यांच्या हृदयात पेटविलीत हे कार्य दिव्य नाही असं कोण म्हणू शकेल?

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥

हे तुम्ही खरे करून दाखविलेत. इतकेच नव्हे तर आजही लोकांना जागृति द्वारा दर्शन देत आहात. हा तुमचा अवतारी संसार खरोखरीचा भव्य दिव्य आहे. म्हणूनच—

'दिव्यत्वाची जेथ प्रचीती। तेथे कर माझे जुळती॥'

★

# निष्कलंक

—सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्रीभुवन, बंदररोड, मु. पो. रत्नागिरी

● सायंकाळची ७ ची वेळ. रोज नियमितवेळी घरी येणारा प्रमोद अजून घरी आला नव्हता. उमाबाईंच्या जिवाची सारखी घालमेल चालू होती. आज गुरुवार दुपारी मायलेकांनी उपोषण केले होते. रात्री आरती वगैरे करून उपवास सोडावयाचा होता. उमाबाईंनी नुकतीच स्वच्छ आंघोळ करून हळूहळू स्वयंपाक करायला सुरवात केली होती. श्रीबाबांच्या आवडीचा सांजा करून झाला होता. भाजी चिरून इतर प्राथमिक तयारी झाली होती. श्रीबाबांसाठी सुंदर ताज्या फुलांचा हार गुंफून पूजेची तयारी करून ठेवली होती. प्रमोद घरी आला की चहा घ्यायचा आणि तो पूजेला बसला की स्वयंपाक पुरतवून नैवेद्याची तयारी करायची पण त्याचाच अजून पत्ता नव्हता. उमाबाईंचा उजवा डोळाही फडफडत होता. त्या सारख्या आतबाहेर करीत होत्या. इतक्यात दाराशी सायकल थांबल्याचा आवाज आला. मोठ्या आतुरतेने त्या बाहेर आल्या. प्रमोदच आला होता. पण त्याने रोजच्यासारखी सायकलची बेल जोरात वाजवून आपल्या आगमनाची वर्दी दिली नव्हती. पिंजऱ्यातल्या पोपटाला शीळ घालून प्रत्युत्तर दिले नव्हते. कोमेजलेल्या चेहऱ्याने तो कसाबसा पायऱ्या चढून वर आला. त्याचा थकलेला उदासीन चेहरा पाहून आपल्या बाळाला आज खूप काम पडले असावे असे भोळ्या उमाबाईंना वाटले. पुढे होत त्या म्हणाल्या, 'बाळ पमा, दमलास का रे ! किती उशीर झाला तुला यायला हा ! मला धीर धरवत नव्हता रे ! फार कष्ट होतात का रे ?' प्रमोद एक क्षणभरच गप्प बसला. लहानपणापासून झालेल्या संस्काराने त्याने मन आवरले आणि म्हणाला, "आई, थांब जरा. मी आधी हात पाय धुवून येतो आणि सांगतो."

प्रमोदने हातपाय धुतले. एवढ्यात उमाबाई चहाचा कप घेऊन आल्या. चहाचा कप दूर सारून प्रमोद म्हणाला, "आई, चहाबिहा काही नकोय मला. आज आमच्या साहेबांनी माझी चांगली चहा केलीय. सकाळी मी त्यांच्याकडे विशेष कामासाठी गेलो होतो हे तुला माहीतच आहे. महत्वाचे कागदपत्र घेऊन मी १५।२० मिनिटातच परत आलो. गरम गरम खिचडी खाऊन ताक पिऊन ऑफिसला गेलो.

मी साहेबांकडे फक्त १५।२० मिनिटेच होतो. तेवढ्या अवधित माझ्याजवळ गोदरेज कपाटात ठेवलेले कागदपत्र देऊन बाईसाहेब चहा करायला गेल्या. साहेब पहाटेच निघून गेले होते. हे कागद आजच्या आज जायचे होते आणि माझ्याकडेच ते काम असल्याने मला त्यांचेकडे जाणे अवश्यच होते. मी कागद ऑफिसात नेऊन काम पूर्ण केले.

४।-४॥ च्या सुमारास साहेब फिरतीवरून घरी आले आणि थोड्याच वेळात तणतणत ऑफिसला आले. एक क्षणही उसंत न घेता ते मजजवळ येऊन कडाडू लागले म्हणाले, प्रमोदराव, छान दिवे लावलेत आज. मला वाटले की सरळ आणि सालस मनाचा मुलगा आहेस तू. पण दिसते तसे नसते म्हणून जग फसते हेच खरे. अरे, मी. पहाटेच निघून जाणार असल्याने महत्त्वाच्या कागदासाठी घरी बोलावले त्याप्रमाणे तू गेलास. बाईसाहेबांनी ते कागद तुझ्याजवळ दिले. गडबडीत कपाट उघडे टाकून तुझ्यासाठी एका कारकुंड्यासाठी त्या चहा करायला गेल्या आणि तेवढ्यात तुम्ही आपले गुण उधळून हजार रुपयांचे बंडल लंपास केलेत. बँकेत भरणा करावयाची रक्कम होती ती. मुकाट्याने आपली चूक कबूल करून ते पैसे माझ्या स्वाधीन कर. नाहीतरी वाईट वर्तणूक असा शेरा मारून तुझी नोकरी मला घालवता येईल. ऑफिसातल्या सगळ्या लोकांसमक्ष गुन्हा कबूल कर. माफी माग बघ, एक-वेळ संधी देतोय तुला. ”

साहेबांचे हे उद्‌गार ऐकून सगळे जग माझ्या भोवती गरगर फिरतेय असे मला वाटले. मी सुन्नपणे बसून होतो माझे सहकारी सगळे अवाक् झाले. ऑफिस सुटे-पर्यंत एखाद्या पुतळ्यासारखा मी एकाच जागी खिळून होतो. कळायला लागल्या-पासून तू सांगशील तसे वागत आलो. गरिबी होती, बाबा नव्हते पण कधी हट्ट केला नाही. टक्कर देत शिकलो. नोकरी मिळाली. गेले ३।४ वर्षे इमानाने नोकरी केली. साहेबांनी वाटेल ती कामे करून घेतली आणि आज मला चोरटा ठरवले. आई, तरंच तुझा बाळ चोरटा आहे असं वाटतं का तुला ? श्रीबाबांनी आपल्या अन्न-वस्त्राला तोटा पडू दिला नाही. मग मला अशी बुद्धी कशी होईल ? ऑफिस सुटले. मित्र रस्त्याच्या कोपऱ्यावर सोडून घरी गेले. माझी पावले नकळत तळ्याकडे वळली तिन्हीसांजा झालेल्या. वाटले की हे कलंकीत तोंड तुला दाखवण्यापेक्षा तळ्याला जवळ करावे. तिथे गेलोही. पण तुझा चेहरा डोळ्यासमोर आला मी गेलो तर तुला जगात कोण ? शिवाय लोक मला चोरटा म्हणणारच. .तरीसुद्धा सायकल टाकून निघालो इतक्यात शब्द ऐकू आले, “मागे फीर. प्रसंगाला धैर्याने तोंड दे. यश तुलाच मिळेल. सबूर, सबूर. ” मग मी परत फिरलो. पण अजून चैन पडत नाही. आई मी निष्कलंक ठरेन ना ! सांग ना आई. तूच काय तो मार्ग दाखव.

उमाबाई शांतपणे उठल्या. कपात चहा ओतून तो त्यांनी स्वतः बाळाच्या तोंडाला लावला. आणि म्हणाल्या, " बाळ जगात सत्य ही एकच गोष्ट शाश्वत आहे तू मुळीच चोरटा नाहीस. अरे ही एक प्रकारे परीक्षाच आहे आपली. असू दे टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवकळा येत नाही. ज्या अशरीरी वाणीने तुला मागे परतवले तीच तुला यातून निभावुन नेईल. जा. आंघोळ कर पूजेची तयारी केलीय आज गुरुवार आपल्या बाबांना विसरलास काय ? मी सांजा केलाय. आता एकीकडे भाजी ठेवते. वरणभात करते; थोडी शेवयांची खीर करीन. हे पदार्थ श्रीबाबांच्या फार आवडीचे तू निःशंक मनाने पूजेला लाग. मी ऊद आणून देते. तुझी पूजा होईपर्यंत माझा स्वयंपाक होईलच. मग नैवेद्य दाखवून दोन घास गरम गरम खाल्लेस की बरे वाटेल चोरीसंबंधी आपण नंतर बोलू–ऊठ बाळ.

आईचे धीराचे शब्द ऐकून प्रमोद उठला गार पाण्याचे शिडकावे अंगावर घेताच चढलेले डोके जरा उतरले. त्याने चटकन आंघोळ आटोपली व सोवळे नेसून पूजेला सुरवात केली. मुखाने साईनामाचा जप करीत तो तन्मयतेने पूजा करू लागला. यावेळी तो चोरीचा विषय विसरला होता. मधून मधून श्रीबाबांच्या मूर्तीकडे तो टक लावून पाही तिथे शांत भाव दिसे. पूजा संपली. त्याने आईला आरतीला हाक मारली. मायलेकांनी धीरगंभीर आवाजात आरती म्हटली. उमाबाई आत गेल्या त्यांनी प्रसादाचे ताट वाढून आणले व श्रीबाबांना नैवेद्य दाखव असे प्रमोदला सांगितले. दुसरे ताट तयार करायला त्या आत गेल्या. प्रमोदने नैवेद्य दाखवला गहिवरलेल्या स्वरात तो म्हणाला, " बाबा, हा नैवेद्य मानून घ्या. माझी आज मनःस्थिती ठीक नाही हो. आज बापाविना पोरक्या असलेल्या या पग्यावर चोरीचा आरोप आलाय. पण तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतो की मी त्यांच्या दमडीलाही शिवलो नाही. माझ्या आईने अत्यंत परिश्रम करून मला वाढवले. शिक्षण दिले आपण आमच्या पाठीशी सदैव राहिलात म्हणून आम्ही हे दिवस पाहिले. आपली नित्य सेवा करीत आलो. पण ती अपुरी पडतेय असे मला वाटतेय. म्हणूनच हे भलते संकट आमच्या वर आलय उद्या जर माझी खरंच नोकरी गेली तर मी काय करू ? बाबा, बाबा, या घाणेरड्या कलंकातून मला मोकळे करा. प्रमोदने श्रीबाबांच्या सुकुमार पदकमलावर डोके टेकून अश्रूंना मुक्त वाट दिली त्याच्या डोळयातले अश्रु श्रीबाबांच्या पायावर पडत होते आणि श्रीबाबांच्या गळयातील हारातली फुले प्रमोदच्या मस्तकावर पडत होती पण त्याचे त्याला भान नव्हते. पाठीमागे उभ्या असलेल्या उमाबाई पुढे झाल्या आणि त्याचा हात धरून म्हणाल्या, " बाळ उठ आता ते ताट घे मी माझं पण वाढून घेतलय. " " नको आई, आज काही इच्छाच नाही खायची हा कलंक धुऊन निघाल्याशिवाय तोंडात पाणीही घालायच नाही असं मी ठरवलंय " मन उदासीन

असताही मुखावर हसू आणत उमाबाई म्हणाल्या, अरे, श्रीसाईसच्चरित वाचूनही तू कोरडाच राहिलास. श्रीबाबांनी खाशाबा देशमुखाच्या आईला काय सांगितलं ते आठव. आत्मा मारून केलेली भक्ती देवाला नाही. श्रीबाबा आपले देव त्यांच्यापुढे आपण सगळं तुच्छ मानत आलो. त्यांची मनापासून भक्ती करत आलो. कुणाला कधी हळहळ केली नाही. जमली तशी मदत केली श्रीबाबा हे सगळं पहात आहेत. ते आपल्याला दूर लोटणार नाहीत. आपल्या तोंडचा घास काढून घेणार नाहीत. उलट तुझा कलंक तेच दूर करतील आणि तुला उच्च पदावर नेऊन बसवतील. जेव बाळ पोटभर जेव. अंतरात्मा शांत झाला की त्यांचे नामस्मरण कर. ते धावून आल्याशिवाय राहाणार नाहीत.

प्रमोद व उमाबाई जेऊन उठल्या. आवराआवर करून त्या बाहेर आल्या. प्रमोद अजून उदास मनःस्थितीतच होता. काय करावे हे त्यांना सुचेना. क्षणभर विचार करीत त्या म्हणाल्या, 'बाळ, बाबा म्हणजे श्रीहरीच. श्रीहरीला कथा, कीर्तन यांची फार आवड. त्याचे नाव घेणारा त्याला अति प्रिय होतो. बाळ, मी नंदादीप लावलाच आहे आता मृगाजिन अंथरते त्यावर तू बस. चौरंगावर बाबांची पोथी ठेव आणि त्यांना शरण जाऊन वाचायला सुरवात कर. आर्तपणे हाक मार. मी श्रवणाला बसते. मनापासून हाक मारली की श्रीसाईहरी नक्की धावून येईल. उमाबाई बोलूनच थांबल्या नाहीत त्यांनी खरेच मृगाजिन अंथरले, चौरंग आणला रेशमी वसनात व्यवस्थित बांधून ठेवलेला 'श्रीसाईसच्चरित' ग्रंथ चौरंगावर ठेऊन त्यावर हळदीकुंकू घातले. चाफ्याचे घमघमीत वासाचे फूल वाहिले. अनन्यभा शरण जाऊन त्यांनी श्रीबाबांना नमस्कार केला आणि प्रमोदला खूण केली. श्री बाबांना साष्टांग नमस्कार करून, पोथीवर डोके टेकून प्रमोदने भक्तीभावाने वाचावयास सुरवात केली 'श्री गणेशाय नमः श्री सरस्वत्यै नमः श्री गुरुभ्यो नमः श्री कुलदैवताय नमः श्री सीताराम चंद्राभ्याम नमः श्रीसद्‌गुरुसाईनाथाय नमः...पोथीचे अध्याय एकामागून एक वाचले जात होते. श्रोत्यांच्या डोळयाना धारा लागल्या होत्या. वाचणारा मधून मधून गहिंवरत होता. पोथीतले प्रसंग डोळयापुढे प्रत्यक्ष दिसत होते श्रीबाबांची अलौकिक शक्ती त्यांचे भक्तांवरचे प्रेम, संकटकाळी धावून जाण्याची वृत्ती, भूतदया सगळे सगळे त्या अध्यायातून होते. होता होता ११ वा अध्याय सुरू झाला हा रुद्राध्याय. वरून रुद्ररूप पण अंतःकरणी भोळा भाव, प्रेम यांचा संगम. असा हा अध्याय प्रमोद वाचू लागला अर्धा अधिक वाचून झाला आणि बुटांचे आवाज पाठोपाठ ऐकू आले. प्रमोदचे साहेब, त्यांच्या पत्नी आणि थोरले चिरंजीव एका पाठोपाठ आत शिरले. समोरचे वातावरण पाहून स्तंभित झाले. हळूवारपणे बूट मोजे काढून मुकाट्याने येऊन बसले आणि शांतपणे ऐक

लागले. अध्याय संपला. प्रमोदने पुन्हा श्रीबाबांना नमस्कार केला व प्रश्नार्थक मुद्रेने साहेबांकडे पाहिले. उमाबाईंही त्यांचेकडे पाहू लागल्या. ओशाळल्या मुद्रेने उमाबाईंना नमस्कार करीत साहेब म्हणाले, ' आई, क्षमा करा मला. दुपारी मी तुमच्या मुलाला उगीचच रागावलो. आमच्या मुलाने कपाटातले नोटांचे बंडल चुकून घेऊन तो गावी गेला. जाताना त्याबद्दल तो काहीच बोलला नाही. त्यामुळे सगळा गैरसमज होऊन या निष्पाप मुलावर मी उगीच आरोप केला. क्षमा करण्याच्या लायकीचाही नाही मी ! कारण चारपाचशे कर्मचाऱ्यांच्या समोर मी तुमच्या मुलाचा घोर अपमान केलाय. पण आता मला कळले की तुमचा मुलगा खरोखरच रत्न आहे. रागाच्या भरात तरुण रक्ताचा एखादा माझ्या अंगावर धाऊन आला असता पण तुमचा मुलगा संयमी, शांत, तुमचे उत्तम संस्कार आणि श्रीसाईंची शिकवण या मुळेच त्याने मनःस्ताप सहन केला पण मला दुरुत्तरे दिली नाही. खरोखरच धन्य आहात तुम्ही. क्षमा केली असं म्हणता ना ? आम्ही चुकलो.

" क्षमा कसली मागता ? पण तुम्हाला मुलानेच पैसे नेले हे कसे कळले ? " साहेबांचा मुलगा सुधीर उठला आणि म्हणाला, " अहो, मी गाडी घेऊन निघालो...पुणे जवळ जवळ येऊ लागले तशी गाडी चालेना. मी खाली उतरलो. ड्रायव्हरही उतरला. गाडी तपासली पेट्रोल संपले का पाहिले. तर नादुरुस्ती नाही व पेट्रोल पुरेसे होते. पुन्हा गाडीत बसून ड्रायव्हर गाडी चालवायचा प्रयत्न करू लागला पण गाडी चालू होईना. मग मी बसलो पण तोच प्रकार मला काय करावे ते सुचेना. मी देवाचे नाव घेऊन पुन्हा प्रयत्न करायला सुरवात करणार तोच एक म्हातारा फकीर गाडीच्या पुढे उभा राहून ' मागे फीर–मागे फीर ' अशा खुणा करत होता. मी लक्ष देईना व पुन्हा प्रयत्न करावयास लागलो तेव्हा त्याने इतक्या रागाने माझ्याकडे पाहिले की मी घाबरलो तरी सुद्धा उसने अवसान आणून त्याच्या वर ओरडावे असे वाटले पण तो फकीर सामान्य नसावा कारण त्याच्या भोवती एक प्रचंड तेजोवलय होते तो म्हातारा होता पण देखणा होता. त्याच्या त्या नजरेत हुकमत होती. त्याचे ऐकावे व मागे फिरावे असे ठरवून मी गाडी वळवायला लागलो आणि काय आश्चर्य ती चालू लागली मागे वळून आपल्या रस्त्याला लागेपर्यंत तो म्हातारा फकीर मला पुढच्या आरशातून पहात असलेला दिसत होता. आमचा ड्रायव्हर आश्चर्याने म्हणाला, " छोटे साहेब, गाडीत बिघाड नाही आता वाऱ्यासारखी पळतेय मग पुन्हा घरी का जायचे ? " मी म्हटले, " अरे, त्या फकिराची आज्ञा आहे तशी. " " कुठला फकीर ? मला कसा दिसला नाही तो. तुमच्या मनाचे खेळ आहेत हे ! मी म्हटले, " नाही; हे खेळ नव्हेत अजूनसुद्धा तो मला दिसत आहे. आता घरी गेलो की याचा उलगडा होईल.

त्याप्रमाणे मी घरी आलो तो आई बाबा उदासीन दिसले. मी कारण विचारले. चोरीची कथा ऐकताच संशयाने मी माझी बॅग उघडली. चुकून माझ्यासाठी ठेवलेले पैसे मी न घेता बँकेत ठेवण्याचे बंडल माझ्या बॅगेतून गडबडीत ठेवले गेले होते. मी कपाट उघडले. माझे पैसे जागच्या जागी होते. मग मी पैशांचा उलगडा करताच प्रमोदवर आपण उगाच अन्याय करून कसे कठोर वागलो ते बाबांनी सांगितले. माझ्या लाडक्या मित्रावरचा हा आरोप ऐकून मी चकीत झालो. लगेच आई-बाबांना गाडीत घालून आपल्याकडे आलो आई. प्रमोदच्या आई, मी तुम्हाला प्रमोदच्या ठिकाणीच आहे. तो आणि मी देहाने भिन्न असलो तरी मनाने एक आहोत या वेड्या सुधीरला व त्याच्या आईबाबांना थोर अंतःकरणाने क्षमा करा. सुधीरने धावत जाऊन प्रमोदला घट्ट मिठी मारली. उमाबाई एकीकडे हसत होत्या—एकीकडे रडत होत्या. रडता रडता म्हणत होत्या, " बाळ प्रमोद, सुधीरला अडवणारा आणि तुझा कलंक पुसून तुला निष्कलंक करणारा म्हातारा फकीर म्हणजे कळलं ना कोण ते ? अरे, आपले लाडके बाबाच रे ते ! गरीब भक्तासाठी कसे धावून आले बघ. त्यांना अंतर्ज्ञानाने सगळे कळते आणि ते आपली काळजी घेतात. आपण मूढ म्हणून रडत दैवाला दोष देत बसलो. असो. त्याने ही आनंदाची वेळ आणलीय तेव्हा या सर्वांचं तोंड गोड करू या. श्रीबाबांचा शांजा खूप आहे तोच देते यांना खायला. हे सुधीर बाळ अड्यावरून परतलेत आणि तसेच न खाता इकडे आलेत ना ! चला सर्वजण स्वयंपाकघरात मी तुम्हाला वाढते.

उमाबाई आत गेल्या. भारावलेले सुधीरचे आईवडील त्यांच्या थोर मनाचा, त्यांच्या निस्सीम भक्तीचा विचार करीत–मनातल्या मनात श्रीसाईंना व त्या माऊलीला वंदन करीत आत गेले आणि दोघे मित्र गळ्यात गळे घालून हर्षभराने त्यांचे मागून धावत सुटले. देव्हाऱ्यातली श्रीसाईंची सुंदर मूर्ती प्रसन्नतेने हसत होती आणि त्या निर्मळ प्रसन्न हास्याने ती खोली अधिकच पवित्र सुंदर भासत होती.

★

# मी पाहिलेले साईबाबा

निवेदन–श्री. शांताराम रा. खडके
बी. एस. सी.
लिमये बिल्डिंग, दुभाष लेन, गिरगाव मुंबई ४

शब्दांकन–श्री. डी. आर. खडके
१४, सहवास, आर. सी. मार्ग
चेंबूर मुंबई ७१

● मानवाचे मन हे प्रत्यक्ष न दिसणारे जगातले सर्वात मोठे अद्‌भुत आहे. ज्याप्रमाणे हे मन शेकडो मैलांचा प्रवास एका क्षणात संपवून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचते त्याप्रमाणे या मानवाच्या मनात अनेक आठवणींचा सुप्त साठा भरलेला असतो व त्यातून काही आठवणी प्रसंगानुसार डोळ्यासमोर उभ्या रहातात. माझी श्री साईबाबा पाहिल्याची आठवण अशीच फार जुनी आहे.

१९१६ साली मला चौथे वर्ष चालू होते. माझा जन्म ५ मे १९१३ रोजी झाला. त्याकाळी आम्ही साताऱ्याला रहात होतो. तेथून मी माझ्या आईवडिलांच्या बरोबर शिरडीला गेल्याचे स्पष्ट आठवते. माझे आई व वडील साईबाबांचे भक्त होते व दर गुरुवारी रात्री नियमितपणे आमच्या घरी साईबाबांच्या तसबिरीची पूजा व आरती होत असे, आम्ही साताऱ्याहून शिरडीला कसे गेलो ते आठवत नाही. पण शिरडीला ज्या घरात आम्ही राहिलो ते घर माझ्या डोळ्यासमोर स्पष्ट दिसत आहे व ते अजून शिल्लक असल्यास मी ते नक्की ओळखू शकेन. बाबांच्या मशिदीपासून सुमारे अर्ध्या फर्लांगावर ते घर होते. त्या घरात जाण्याकरिता तीनचार पायऱ्या चढल्या की प्रथम एक ओटा होता. आत गेल्यावर एक मोठी खोली व नंतर स्वयपाक घर होते.

शिरडीत आम्ही अदमासे ५/७ दिवस राहिलो. त्या मुक्कामात माझी आई ओढ्यावर कपडे धुण्यास जाताना मला बरोबर घेऊन जात असे व मला बाजूला बसवून कपडे धूत असत. मी खेळण्याकरिता बऱ्याच वेळा मशिदीत जात असे. मशिदीच्या आत तीन चार पायऱ्या चढून गेल्यावर जो ओटा आहे त्यावर उजव्या बाजूला बाबा बसलेले असत. अजाण वयामुळे त्यावेळी मला बाबांचे महत्त्व काहीच माहीत नव्हते. मशिदीत बऱ्याच वेळा मंडळी बसलेली असायची. एका दुपारी आरतीच्या वेळी ओट्यावर बाबांच्या समोर १०/१२ मंडळी उभी होती व ती बाबांची आरती म्हणत होती त्या सर्वांच्या पुढे मी छोटासा मुलगा बाबांच्याकडे तोंड करून उभा होतो.

बाबांच्या समोर खव्याच्या वर्फीच्या वड्यांची दोन ताटे भरलेली होती, आरती संपल्यावर बाबांनी " खडके " म्हणून मला हाक मारली. माझ्याकडे बोट करून त्यांनी मला जवळ बोलावले. बाबांनी कशाकरिता हाक मारून मला बोलावले हे मला समजले नाही. मी थोडा गोंधळलेल्या मनाने बाबांच्या पुढे गेलो तेव्हा त्यांनी समोरच्या ताटातल्या दोन वड्या उचलून माझ्या हातावर दिल्या. त्या हातात जपून ठेऊन मी आमच्या शिरडीच्या घरी गेलो व मी माझ्या आईना म्हणालो " यातील एक वडी आण्णांना व नानांना ( माझ्याहून थोडे मोठे असलेल्या सातारच्या दोन भावांना ) द्यायची " पुढे काय झाले ते आठवत नाही.

त्या शिरडीच्या मुक्कामात एके दिवशी उघड्या बैलगाडीतून कोणी एका माणसाने आणलेला वाघ मी बघितला. तो माणूस पुढे बसून गाडी चालवत होता व व वाघ पाठीमागे गाडीत बसला होता. ती गाडी मशिदीच्या जवळून चालली होती.

त्या मुक्कामात एके दिवशी संध्याकाळी अंधार पडण्याच्या सुमारास माझ्या आईला घरामधे इंगळी चावली. माझे वडील त्यावेळी घरी नव्हते. ते दूध आणण्याकरिता बाहेर गेले होते. आई त्यावेळी गरोदर होत्या व त्या मोठमोठ्याने रडत होत्या. पुढे काय झाले ते आठवत नाही. पण काही वर्षांनंतर मी आईच्या तोंडून ऐकले की दुसऱ्या दिवशी त्या जेव्हा बाबांच्या दर्शनाला गेल्या तेव्हा बाबांनी आपणहून बोलून दाखवले की, " काल रात्री मला फार त्रास झाला... " त्यावरून बाबांना आदल्या रात्रीचा इंगळी चावण्याचा प्रकार अंतर्मनाने माहीत पडला हे स्पष्ट होते.

बाबांना एका सकाळी आठनऊ वाजण्याच्या सुमारास मशिदीतून बाहेर जाताना मी पाहिले. लोक म्हणत होते की, बाबा लेंडीबागेत गेले. त्यांच्याबरोबर त्यावेळी ८/१० मंडळी गेली.

मी पाच किंवा सहा वर्षांचा असताना माझे आईवडील पुन्हा साताराहून शिरडीला गेले. पण त्या खेपेस त्यांनी मला नेले नाही म्हणून मी खूप रडल्याचे मला आठवते.

पुढे १९४० साली माझ्या वडिलांचे मित्र कै. प्रोफेसर नारके यांचेसोबत शिर्डीला जाण्याची मला संधी मिळाली. माझ्या शिर्डीच्या जुन्या स्मृती त्यावेळी माझ्या डोळ्यापुढे असल्याने मला शिर्डीत नवीन असे फारसे काहीच वाटले नाही व एखाद्या जुन्या परिचिताप्रमाणे मी शिरडीत वावरलो.

अशा आहेत पासष्ट वर्षे मनात दडून राहिलेल्या माझ्या श्रीसाईबाबांच्या आठवणी.

✣ ❀ ✣

# मूर्ती, पोथी आणि प्रचिती

—प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव, पुणे ३०

● कोणत्याही उपासनापंथातील उपासना सामान्यतः मूर्ती आणि पोथी या दोन माध्यमांच्या द्वारे चालते. चंचल मन चिकटवून ठेवण्यासाठी एक मूर्ती लागते. चिकटलेले मन अंतर्मुख करण्यासाठी पोथी लागते. पूजा, आरती, नैवेद्य, पालखी, उत्सव यामुळे मूर्ती मनात ठसते. पोथीचे वाचन, श्रवण, मनन, निदिध्यासन यामुळे चित्तशुद्धी होऊन मूर्तीची भावनात्मक प्राणप्रतिष्ठा मंदिररूप मनात न कळतच होऊन जाते.

यामुळेच उपास्य दैवताची मूर्ती किंवा छबी पुढे ठेवून तिची यथासांग पूजा करून मगच तिच्या सान्निध्यात पोथी वाचली जाते. मूर्ती किंवा छबी नसेल अशा ठिकाणी एक पाट मांडला जातो. त्यास रांगोळी काढली जाते. उपास्य दैवत पोथी पठनाच्या वेळी तेथे पोथी श्रवणास बसते या संकेतामुळे ही पद्धत रूढ झाली. दत्त-संप्रदायात श्रीगुरुचरित्राच्या पारायणाच्या विशेषतः सप्ताह करण्याच्या वेळी समोर पाट मांडण्याची पद्धत यामुळे रूढ झाली.

पंढरीच्या वारकरी संप्रदायाने मूर्तीपेक्षा पोथीला प्राधान्य दिले आहे. श्रीमुखाच्या दर्शनाची ओढ प्रत्येक वारकऱ्याच्या अंतःकरणास रात्रंदिवस लागते. पंढरीस जाऊन चंद्रभागेचे स्नान करून पांडुरंगाचे दर्शन कधी एकदा घेतो असे वारकऱ्यास होऊन जाते. आषाढी-कार्तिकीच्या वारीच्या निमित्ताने पंढरीस जाऊन वारकरी श्रीचरणी मिठी घालतो. पांडुरंगाची चरणे डोळ्यातील प्रेमाश्रूंनी धुवून काढतो. तरीसुद्धा सांप्रदायिक पोथीचे पठन, नित्यपाठ केल्याविना त्याच्या श्रीमुख-दर्शनाची पूर्ती होत नाही. म्हणूनच पोथी, कीर्तन, पंचपदी यांची योजना झाली.

एकीकडे श्रीमुख न्याहाळणे तर दुसरीकडे नित्यपाठ चालू ठेवणे असा क्रम करीत असल्यामुळे श्रीमुखदर्शनासाठी बारीत ताटकळत उभे राहाण्यासाठी जितके तास खर्ची पडतात तितकेच तास वाळवंटातील कीर्तनासाठी आपोआपच दिले जातात इतके तास देऊनही वारकरी कंटाळत नाही. उलट सुखावतो. रामकृष्णहरीच्या भज-

नात दंग होऊन चंद्रभागेच्या वाळवंटात नाचू लागतो. जणू येथे देहभ्रम नाहीतच. आहे ती एक विश्रांती !

वारकरी संप्रदायाचे श्रीज्ञानेश्वरी, श्रीगाथा, श्रीहरिपाठाचे अभंग यांच्याप्रमाणे दत्तसंप्रदायात श्रीगुरुचरित्र, रामदासी संप्रदायात श्रीदासबोध यांचे वाचन-श्रवण-मनन निष्ठापूर्वक चालू असते. देहशुद्धी, निराहार, व्रतस्थपणा यांच्यामुळे चित्तशुद्धीचे अधिकात अधिक फळ पदरी पडावे हा त्यामागील हेतू असतो. ती झाल्यानंतर प्रचिती म्हणजे अनुभव पदरी पडतो. अशा रीतीने मूर्ती, पोथी आणि प्रचिती यांच्या अन्योन्य संबंधाची पातळी जितकी उंचावत जाईल तितकी उपासना फलदायी होऊन निरामयता प्राप्त होते. मनोक्लेश नाहीसे होऊन मन पूर्ण स्थिर आणि शांत होते.

ही मूर्ती नव्हे, हा साक्षात् भगवंतच; ही पोथी नव्हे, हे साक्षात् भगवंताने माझ्याशी केलेले हृद्गतच; ही प्रचिती किंवा अनुभव नव्हे; प्रत्यक्ष भगवंताची मला लाभलेली ही सोबतच. हा भाव जेव्हा स्थिर होईल आणि वाढीस लागेल तेव्हा भक्त केवळ एका भगवंताचाच होऊन जाईल. असा भक्त जे बोलेल, सांगेल, लिहील ते सर्व त्याचे व्यक्तिगत नसून भगवंताचेच असेल. फार काय भगवंत आणि तो विभक्त नसल्यामुळे भक्तच भगवंत होईल !

मूर्ती, पोथी आणि प्रचिती यांच्यामुळे जो निर्मळ झाला. वासनारहित झाला तोच परब्रह्मपद याचि देही पावला.

★

# ॥ संतांच्या अकल्पित भेटी ॥

—कु. प्रीति वी. देशमुख
द्वारा विजय देशमुख, असिस्टंट इंजिनिअर
टेलीफोन एक्श्चेंज क्वार्टर्स, ए–२ नौपाडा ठाणे

● श्री पांडुरंगाची कार्तिक वारी नुकतीच संपली होती. हळूहळू चंद्रभागेचे वाळवंट रिकामे होत होते. बहुधा १९१३ सालची नोव्हेंबरची तेरा तारीख. सायंकाळची वेळ चांदणे पडू लागले होते. अशावेळी श्री पुंडलीकाचे मंदिरापासून एक नौका चंद्रभागेतून गोपाळपुऱ्याकडे डुलत डुलत निघाली. त्यात तीन व्यक्ती होत्या. तेजःपुंज चेहरा, थोडे स्थूल शरीर, घोगरा आवाज, आणि हसत मुख असलेले. संत शिरोमणी वारकरी समाजाचे अध्वर्यु श्री संत दादामहाराज सातारकर, ह्यांचेबरोबर डॉक्टर तळवलकर व भाऊसाहेब टिळे, ही त्यांची शिष्य मंडळी होती. सहज डॉ. तळवलकर म्हणाले की, महाराज मला वाटते की आपली व शिरडीचे श्री सद्‌गुरु साईनाथ यांनी एकदा एकत्र भेटलेले पहावे. महाराज प्रथम ' नको ' म्हणाले कारण त्या सत्पुरुषाला विनाकारण त्रास का द्या? परंतु तळवलकरांचा आग्रह पाहून महाराज तयार झाले. नंतर सर्वांनी कोपरगावची तिकीटे काढली आणि गाडीतून सुखरूप सर्व पोहचली.

त्यावेळी तेथे श्री हरिभाऊ देशमुख नावाचे स्टेशन मास्तर होते. तेही वारकरी असल्याने एका पांडुरंगावाचून इतर देव मानीत नसत. श्री. दादामहाराजांना त्यांनी ओळखून चरणांवर मस्तक ठेविले. परंतु महाराज, तुम्हांला खूळ लागले आहे का! साईबाबास भेटण्यास येणाऱ्यांचे सर्व द्रव्य साईबाबा घेतात. त्यांचे जवळ परत जावयास इतकेच काय पण शिरडी ते कोपरगाव टांग्याचेही पैसे ठेवत नाहीत. तुम्ही जाता येता टांगा ठरवुन ते पैसे टांगेवाल्यास आधीच द्या. मी कोपरगाव ते सातारा तुमची तिकिटे काढून ठेवतो. मग खुशाल जा. "

डॉक्टरांचे जवळ २५० रुपये होते. ते महाराजांना येथूनच फिरू म्हणू लागले. परंतु दर्शनाच्या इच्छेने येथपर्यंत येऊन साईचे दर्शन पैशाचे भितीने न घेता परत जाणे बरे नव्हे. मी बरोबर असताना तुमचे पैसे ते घेणार नाहीत. माझ्यावर विश्वास ठेवा. मात्र तुमच्या मनातून जे त्यांना द्यावेसे वाटेल त्यात हयगय करू नका, निदान एकेक पैसा तरी ठेवाच असे महाराज म्हणताच प्रत्येकाने आपले मनात संकल्प करुन महाराजांना सांगितले. महाराजांना समाधान झाले.

टांगे चालू लागले. मंडळी मंदिरापाशी आली. मंदिरात पहातात तो सद्‌गुरु साईनाथ स्नान करीत होते. हातातील तांब्या तसाच स्थिर ठेवून बाबा म्हणाले.

'या विठ्ठला, सकाळपासून वाट पहात आहे मी' बाबांनी उठून महाराजांना हाताशी धरून मशिदीत नेले महाराजांनी बाबांना साष्टांग नमस्कार घातला. बाबांनी उचलून महाराजांना पोटाशी धरले. दोघांच्याच्याही नेत्रातून प्रेमाश्रू वाहू लागले. क्षणभर बाबा थांबले व तेथीलच उदी उचलून महाराजांना आपादमस्तक न्हाऊन काढले. आणि फक्त एवढेच म्हणाले की 'तू धन्य आहेस तुझा परमार्थ यथायोग्य होईल. पण तू आता लगेच परत जा येथे राहू नकोस रहाण्याची तुला परवानगी नाही.' मंडळींनी पैसे संकल्पाप्रमाणे देऊ केले. परंतु बाबांनी जवळच असलेला एक नारळ फोडून सर्वांना दिला व लगेच जाण्याची आज्ञा केली.

मंडळी सातारला आली. 'सकाळपासून वाट पहात आहे मी' हे वाक्य महाराज बरेच दिवस नंतर मधून मधून उच्चारत व म्हणत की, या संतानी आपले सामर्थ्य आशिर्वाद रुपाने त्यांच्या अनुभवाच्या सिद्धि विनासायास एका भेटीतच नव्हे एका मिठीतच मला देऊन गेले. वाट पाहिली या बाबांच्या म्हणण्याचा खरा अर्थ त्यांच्या आशिर्वादास मी पात्र ठरलो असाच नाही का! ☆


॥ श्री दत्तमहाराज प्रसन्न ॥

साई म्हणे तोचि तोचि झाला धन्य ।
झाला जो अनन्य माझ्या पायी ।।

सोन्याची शुद्धता आणि कलात्मक दागिने बनविणारी
माहिम भागातील विश्वासपात्र एकमेव पेढी म्हणजेच—

**मे. शंकर हरी वैद्य ( रत्नागिरीकर )**
**आणि कुष्टे ज्युवेलर्स**

पाठारे मॅन्शन, ले. ज. रोड, माहिम, मुंबई—४०० ०१६.

फोन : ४६७०१८

सिटीलाईट सिनेमा जवळ

[बी. वाय. पी.]

# हो खरंच बाबांनीच जागा दिली

–सौ. सुधना सुरेश करमरकर
७४/१, जानकी निवास, सुर्वे बंगला
पायोनियर सोसायटी समोर
पनवेल–जिल्हा रायगड

● जवळ जवळ १–१॥ वर्षापूर्वीची गोष्ट आहे. आम्ही पायोनियर सोसायटी पनवेल येथे रहात होतो. जागा सुंदरच म्हणजे तीन खोल्यांचा ब्लॉक होता. भाडं पण तसंच म्हणजे २७५ होतं. पण ॲडव्हान्स फार न लागता लकीली ती जागा मिळाली. जेमतेम वर्षभर राहिलो. सर्व सोयी करून घेतल्या. मस्त कलर वगैरे लावून घेतला. पण काही कारणास्तव ती जागा सोडण्याची वेळ आली. ती जागा १ तारखेच्या आत म्हणजे १–९–८० च्या आत खाली करून द्यायची होती. पनवेलसारख्या ठिकाणी जास्त भाडं द्यायची, ॲडव्हान्स द्यायची हिंमत असूनही जागेसाठी वणवण दोघं फिरत होतो. सोमवार, मंगळवार, बुधवार सतत फिरूनही ओळखी असूनही जागा मिळण्याचं नाव नाही. शेवटी गुरुवारी मी साईबाबांवर चिडले. सर्व राग त्यांच्यावर काढला. पिठलं–भाकरीचा दर गुरुवारी नैवेद्य दाखवणारी मी बाई त्या दिवशी नैवेद्यच दाखवला नाही. आणि काय आश्चर्य साईनाथांना माझी दया आली. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी लगेच एक जागा सध्या रहात असलेल्या ठिकाणापासून दोन मिनिट अंतरावरच जागा मिळाली. जागा लहान म्हणजे दोन खोल्या पण घरात नळ वगैरे सर्व सोयींनी युक्त अशी जागा साईनाथांनीच दिली असं म्हणायला हरकत नाही.

जागा मिळू दे मग साईलीलेत लेख देईन असं मी बोलले. पण देऊ देऊ म्हणताना एक वर्ष गेलं. तरी साईनाथांनी न रागावता क्षमा करावी ही मी त्यांच्या चरणी त्यांना विनंती करते.

# दोन स्वप्ने

—श्री. सुरेश सातपुते
मुंबई १२

● बाबा शिर्डीमध्ये सगुणरुपाने वावरत असताना. आपल्या दर्शनार्थी भक्तांना त्यांच्या प्रिय दैवतांच्या स्वरुपात दर्शन देत होते. ही गोष्ट सर्व साई भक्तांना ज्ञात आहेच परंतु बाबा अद्यापीही, पूज्य दैवताच्या स्वरूपात कसे दर्शन देतात, परंतु त्याच वेळी क्षणक्षणीत शब्दात कसे फटकवतात यांची हकीकत आज साईभक्ताना सांगण्याचे योजले आहे.

बाबांचा महिमा ऐकून मी शिर्डीस गेलो, आणि एस. टी. तून स्टॅण्डवर उतरलो (स्वप्नामध्ये) स्टॅण्डवर उतरताच तेथे जुनी शिरडी आणि तेथे एक मोठी वेस असलेली दिसली. मी आजूबाजूला उभे असलेल्या माणसांकडे चौकशी केली– " काय हो ! इथे साईबाबा, साईबाबा म्हणतात ते बुवा कुठे असतात ? त्यावर कुणीतरी उत्तरला " ओ क्या ! पेड के निचे फकीर पडया है। "

त्याने बोटाने दाखविलेल्या दिशेने वेस पार करून मी चालू लागलो तोच, समोर एक मोठा हिरवागार असा वृक्ष दिसला. त्याच्या भोवती ऐसपैस रुंदी उंचीचा एक पारही बांधलेला होता.

त्या पारावरच झाडाच्या बुंध्याचे उसे करून एका हाताचा हनुवटीस आधार देऊन माझे पूज्य दैवत कणकवलीचे दत्त भगवान श्री भालचंद्र महाराज यांच्या स्टाईलमध्ये पडून मी बाबा चाललेल्या दिशेकडेच टक लाऊन पहात होतो. मी जवळ गेलो अन् पाहिले तर, बाबांनी पांढरा म्हणता येईल अशा रंगाचा एक पिवळट पडलेला हाफशर्ट व रंग जाऊन सफेत होऊ घातलेली एक जीनची फुलपँट घातलेली होती. मी मोठ्या कुतुहलाने त्यांच्यावरुन नखशिखांत दृष्टी फिरविली. तोच त्यांच्या पायाच्या उजव्या आंगठ्यास डॉक्टरने बँडेज करावे तशी एक चिंधी गुंडाळलेली दिसली. ती पाहून लगेच माझ्या मनात विचार आले—

" अरेच्या ! हे मोठे संत म्हणवितात. पण यांच्याही पायाला आपल्या प्रमाणे जखमा होतात. व डॉक्टर कडून मलम पट्टी करावी लागते म्हणायची ? "

पण असले विचार कुणाच्या मनात आले आणि त्याला रोख ठोक उत्तर साईबाबांनी दिले नाही असे "स्वप्नात देखील" घडावयाचे नव्हते !

माझ्या विचारांचा शेवट व्हायच्या आतच ते ताडकन् केव्हा उठून बसले ते माझी त्यांच्यावर सतत नजर असूनही मला समजले नाही, व एक दाखविताना करतो तशी आपल्या उजव्या हाताची तर्जनी माझ्या डोळ्यापुढे नाचविली, आणि लगेच त्याच तर्जनीने उजव्या पायाच्या बँडेज बांधलेल्या आंगठ्यास अलगद स्पर्श केला. तोच आश्चर्य घडले–उजव्या पायाचा "तो" आंगठाच हवेत विरळावा तसा अदृश्य झाला !

आता मात्र मी खरोखरीच स्तिमीत झालो ! स्वतःस चिमटा घेऊन पाहीले, पण खरोखरीच तिथे 'तो' आंगठा नव्हताच. बाकीची चार बोटे मात्र तशीच होती. पण विचारांनी पुन्हा एकादी कोलांटी उडी मारली—

'अरेच्या ! हा चमत्कार आहे ! साईबाबा चमत्कार करतात ! खरे संत कधी चमत्कार करीत नाहीत !...मग ?

परंतु हे विचार संपता संपताच क्षणाचाही विलंब न लावता किंवा न रागावता परंतु क्षणक्षणीत शब्दात बाबा म्हणाले—

'मूर्खा ! हे सर्व तुला इतक्यात कळायचे नाही !'

आणि मी जागा होतो. परंतु प्रत्यक्षातच काय पण स्वप्नातही शंकाखोर भक्तांच्या थातूर मातूर विचारांना हाकलून देणाऱ्या श्री साईबाबांचे सामर्थ्य अचाटच नव्हे तर, अतर्क्यही असेच म्हणावे लागेल.

यावरून सारे संत एकच ! देह हे संताचे भ्रामक स्वरुप आणि विदेही स्थिती हे खरे स्वरुप आहे. म्हणून आमच्या बाह्यवर्तनावरून कोणी त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असेल तर तो त्याचा मूर्खपणा आहे. असे तर बाबांना सांगायचे नव्हते ना ?

× × ×

वरील प्रसंगी मी शिर्डीस गेलो तर, दुसऱ्या प्रसंगी स्वतः बाबाच आमच्या दुकानात आले. म्हणजे मी बसलो होतो तो, समोरच ते प्रकट झाले व म्हणाले—

'चलो !'

बाबांचा एकूण वेषही मोठा पांढरा शुभ्र म्हणजे अगदी स्नो व्हाईट होता. दाढी वगैरे देखील कोरून साफसूफ केलेली होती. डोकीचे फडके देखील अगदी टापटीपीने गाठ मारून व्यवस्थित बसविले होते. मनात म्हटले—

'सर्व तयारी करून स्वारी कुठे फिरायला निघालेली दिसते!'

मनातील विचार ऐकूनच ते म्हणाले—

'हाँऽऽ! चलो जल्दी!'

मी अगदी भारल्याप्रमाणे उठून चालू लागलो. तोच ते माझ्या खांद्यावर हात टाकून माझ्याबरोबर चालू लागले म्हणाले—

'चलो! किधर जाने का?'

मी म्हणालो, "बाबा! तुम बोलो जिधर।"

"तो फिर चलो।" असे म्हणून बाबा माझ्या खांद्यावरच हात टाकून मला नेऊ लागले.

इतक्यात बाबांनी एक रणगाडा बस (दुमजली ट्रेलर) थांबविली. तिथे स्टॉप नव्हता. बसमध्येदेखील एकही पॅसेंजर नव्हता. मनात म्हटले, "मुंबईत स्टॉप नसताना बस थांबणे तीदेखील रिकामी! हे बाबा बरोबर असताना स्वप्नातच घडू शकते!" बसकडे पाहिले तो ती 6 Ltd म्हणजे चेम्बूरला जाणारी बस होती.

बाबांनी मला खांद्यावरच्या हातानीच बसमध्ये ढकलले. अन् ते स्वतःही चढले. बाबा आत चढताच डाव्या बाजूच्या आडव्या सीटवर बसले आणि मी त्यांच्या समोरच्या आडव्या सीटवर बसलो. बसमध्ये इतर पॅसेंजर नव्हते. कंडक्टरही नव्हता. पुन्हा म्हणाले, "चलो।"—कोणाला उद्देशून ते समजले नाही. बहुधा त्या निर्जीव बसला उद्देशून ते म्हणाले असावेत. कारण लगेच बस चालू झाली आणि बाबांनी कफनीच्या खिशात हात घालून तिकीट काढण्यासाठी कोऱ्या करकरीत नोटा बाहेर काढल्या.—त्यात एक नोट पाचाची व दुसरी नोट दोन रुपयांची होती— (बसमध्ये कंडक्टर नसताना बाबा तिकीट कोणाकडून काढणार होते. ते देवालाच—म्हणजे त्यांनाच ठाऊक!)

पण इतक्यात माझे लक्ष बाबांच्या पायाकडे गेले. ते कमालीचे स्वच्छ होते.

होते. त्याचवेळी माझे लक्ष स्वतःच्या पायाकडे गेले. ते अगदी मळलेले व घाणेरडे दिसले. मनात विचार आला—

" शिर्डीहून चालत आलो असे हे मघाशी म्हणाले, तरी यांच्या पायाला टिपूस भरही धूळ किंवा डाग लागलेला नाही. हे कसे ? हे मोठेच एक नवल मला वाटत असताना मी जागा झालो !

संतांच्या सर्व देहापेक्षाही त्यांचे चरण महत्वाचे असून ते अत्यंत शुद्ध व पवित्र असतात. पाच ज्ञानेंद्रिये व श्रद्धा आणि सबुरी या तिहींचा योग्य वापर केल्यानेच संतांशी खरी जवळीक होते असे तर बाबांना ह्या स्वप्नाद्वारे सुचवायचे नव्हते ना ?

दोन्ही स्वप्नात बाबांचे परम पवित्र चरण दिसणे ही गोष्ट मुळी किती आनंद दायक आहे म्हणून त्याच चरणावर मस्तक ठेवून म्हणतो.

साईनाथ शरणं मम् !

## कै. दिवाकर पुरुषोत्तम भालेराव, अभिषेक ब्राम्हण यांना श्रद्धांजली

श्रीसाईबाबा संस्थानचे मंदिर विभागातील एक विद्वान मनमिळावू अभिषेक ब्राम्हण श्री. दिवाकर पुरुषोत्तम भालेराव यांना पुणे येथे दि. ७–६–८१ रोजी देवाज्ञा झाल्याचे त्यांचे दुःखद निधनाबद्दल सर्वांना तीव्र दुःख झाले. त्यांचे कुटुंबियांचे दुःखात आम्ही सहभागी आहोत. त्यांच्या आत्म्यास शांति व सद्‌गती मिळावी.

क. हि. काकरे
कोर्ट रिसीव्हर,
श्रीसाईबाबा संस्थान शिरडी.

दिवाकर पुरुषोत्तम भालेराव, अभिषेक ब्राह्मण यांचे दुःखद् निधनाचे वृत्त कळाले बरोबर सर्व संस्थान सेवकांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करून त्यांच्या आत्म्यास शांति व सद्‌गती लाभावी म्हणून दोन मिनिटे स्तब्धता पाळली, व वरील प्रमाणे श्रद्धांजली अर्पण केली.

'श्रद्धा व सबुरीचा' एक सत्य अनुभव

# साई कृपेने पार पडलेले एक लग्न

—श्री. जगदीश देवपूरकर 'सुलोच'
ग. नं. ५, २६४३ धुळे
धुळे ४२४००१

● महाराष्ट्राची पुण्यभूमी ही संतांची पुण्यभूमी आहे. तलवारीच्या जोरावर ज्या मराठ्यांनी महाराष्ट्र जिंकला त्याच महाराष्ट्रात थोर संतांनी श्रद्धेच्या जोरावर महाराष्ट्र गाजविला. ज्ञानेश्वरांची ज्ञानवाणी, तुकारामाची अभंगगाथा, एकनाथांचा भक्तीमार्ग व विठूरायाची पंढरी यासारख्या असंख्य भक्ती पंथातील वारकऱ्यांनी महाराष्ट्राच्या घराघरात भक्तीचा 'ज्ञानदीप' प्रज्वलीत केला. ह्याच महाराष्ट्राचे भूषण ठरलेले 'श्री शिर्डी तिर्थक्षेत्र' व तेथे समाधिस्त झालेले, लाखो लोकांना दयेचा हात देणारे साईबाबा ह्याच महाराष्ट्राच्या भूमीत आहेत. सुर्याच्या प्रकाशाइतकेच थोर महात्म्यांचे कार्य सत्य सुंदर असते. आयुष्यभर साईबाबा चंदनासारखे जगले म्हणून समाधी नंतरही त्या चंदनरुपी पुरुषाच्या नाम सुगंधाने हजारो निराधारांना आधार मिळतो. जेव्हा मानवरुपी सारे प्रयत्न व्यर्थ ठरतात तेव्हा ईश्वरी शक्ती कार्य करते. फक्त पाहीजे तेथे 'श्रद्धा व सबुरी'

खांदेशाच्या परीसरात धुळे नावाचे एक शहर आहे. तेथे घडलेली ही एक सत्य घटना. तसे लग्नाचे प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यात येतात. सप्तपदीची पाऊले ओलांडून प्रत्येक मुलगी संसाराच्या क्षेत्रात प्रवेश करत असते. निर्विघ्नपणे पार पडलेल्या लग्नास विघ्नहर्ता नेहमीच प्रसन्न असतो. पण या एका प्रसंगाला तो विघ्न-हर्ता झोपला असावा. निस्वार्थपणे समाजाची सेवा करणाऱ्या साईभक्त कवि व नृत्य-कार-नागेश मोगलाईकर यांच्यावरच तो प्रसंग ओढवला. लहान लहान संकटातून पार पाडीत मनुष्य महान होत असतो. आणि याच प्रसंगातून मनुष्याचे श्रद्धास्थान बळकट होत असते.

शैला व पौर्णिमा या दोघी बहीणी त्यांचा विवाह काशिनाथ व विजय या सोलापूरच्या नंदी घराण्यातील दोन तरुणांशी ठरला. लग्नाची तारीख ठरली ४ मे १९८० लग्नाला तीनच दिवस राहीले आणि अचानक शैलाला [illegible]

सारे हवालदील झाले. उद्या ज्या अंगाला लग्नाची हळद लागणार ते अंग अगोदरच क्रूर काविळीने पिवळे धमक होऊन गेले. मुलीचे वडील श्री. नागेश मोगकाईकर हे अगोदरच कवी मनाचे अशा हळव्या व कोमल वृत्तीच्या माणसाची शब्द हीच संपत्ती, असतील नसतील सारे शब्द परमेश्वराला अर्पण करून ते शांतपणे दवाखान्याच्या बाहेर फेऱ्या मारीत उभे होते. लग्न अवघ्या दोन दिवसांवर राहीले शैलाची तब्बेत ठिक होण्याचे चिन्ह दिसत नव्हते. आणि अचानक दुपारी ४ वाजता मला डॉ. बियाणीच्या दवाखान्यात साईबाबांची आठवण झाली. यापूर्वी धुळयाचे बरेचसे डॉक्टर शैलाला वाचवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यात डॉ. श्री. व सौ. पानट, डॉ. पी. टी. जोशी, डोंगरेसर, डॉ. कादरी, व डॉ. जे. जे. शहा, सऱ्या डॉ. ची प्रयत्नांची झुंज चालू असताना ज्याने माणसाला जन्म दिला त्या डॉ. ची आठवण झाली. शिर्डीचा परमेश्वर मला आठवला. शिर्डी संमेलनाहून परत येताना आणलेली बाबाकृपेची उदी माझ्या पाकीटातच होती. ती रक्षा व सैलानीबाबांची रक्षा मी अप्पांजवळ दिली. सांगितले 'आप्पा आता लग्न सुखरूप होईल.' दोन श्रेष्ठ संतांची श्रद्धा एका पुडीत सामावली होती. हजारो रूपये खर्च करूनही जे साध्य होत नाही ते या चिमुटभर रक्षेने साध्य होऊन गेले.

शैलाला बाबांची रक्षा लावली. शैलाची सलाईनची बाटली बंद झाली. हळूहळू शैला शुद्धीवर आली. इतक्यात दोन मेच्या मध्यरात्री सोलापूरचे लग्नाचे वऱ्हाड एस. टी. तून उतरून दारात येऊन थांबले. पाहुण्यांचे आगमन व स्वागत झाले. शैला दवाखान्यात पुन्हा अस्वस्थ झाली. येणाऱ्या पतीराजाला हळूवारपणे बंद खिडकीच्या फटीतून पहाण्याऐवजी ती नुकत्याच संपलेल्या सलाईनच्या बाटलीकडे पहात होती. नको त्या विचारांनी पुनः ती अस्वस्थ झाली. तिची शुद्ध हरपली. पुनः सर्व डॉक्टर येऊन पोचले आणि सर्वांच्या मताने शैलाला डॉ. कादरींच्या दवाखान्यात हलविण्यात आले. रात्रीचे १० वाजले होते. शैलाला पुनः सलाईन सुरू झाली. सकाळी ९-५७ चे लग्न आणि शैला मृत्युशी झगडते आहे. आप्पांनी मला डोळयातूनच विचारले, 'जगदीश ! बाबांच्या मनात काय आहे रे ?' मी त्याच डोळयांच्या भाषेतून बोललो 'आप्पा ! खऱ्या सोन्याचा दागिना घडविण्यापूर्वी त्याला मुशीत खूप तापवावं लागतं ना. शैलाच्या आयुष्याचा सुंदर दागिना बाबा घडवित आहेत तुम्ही फक्त पहात रहा.'

शैलाचा होणारा भावी पतीराज श्री. काशिनाथ हा दवाखान्याच्या जवळच उभा. न बोलताही तो बिचारा परमेश्वराशी खूप काही बोलत असावा असे वाटते. दर क्षण महत्वाचा होता. सोलापूरची सारीच माणसे समजदार. ते म्हणाले, मुलीला

बरे वाटल्याशिवाय आम्ही जेवणार नाही. संसाराची सुंदर पहाट उगवण्यापूर्वी ती मृत्युशी झुंज देत होती आणि त्यात ती विजयी होणार ही गोष्ट तितकीच सत्य होती. पण वेळेवर युद्धात विजय मिळाला तरच जिंकलेल्या प्रदेशावर राज्य करण्यात मौज असते. अखेर शैला हे युद्ध जिंकली. परमेश्वराने पाहिलेली सत्व परीक्षा संपली. लग्नाच्या मंडपात एक दोन तास उभी राहील का नाही ! ही शंका होती, ती शैला शांतपणे मंडपातल्या साऱ्या विधी पार पाडीत होती. साईबाबांची प्रेरणा प्रत्येक क्षणाला तिला शक्ती देत होती. लग्नाची इतर कामे करण्यात सारी माणसं यंत्रासारखी दंग झालेली. अखेर सारे ठीक झाले. एक लग्नाची नौका जी काळीच्या वादळात सापडली ती साईकृपेने संसाराच्या किनाऱ्यावर सुखरूप येऊन पोचली. पुनः दूरचा प्रवास करण्यासाठीच.

Books on Saibaba

# "A MISSION DIVINE!"

## " मशिदीत प्रगटला परमेश्वर!"

have no parallel, Mr. Anant Pai kane of Goa has rightly said in his letter : '–I have read many books on Sai Baba. 'Sai Satcharit' I have perused atleast four or five times. But the way you have unrolled the life-story of Sai Baba in a well conjoined manner has no parallel. You have very consistently, beautifully and easily linked the events which imprint a deep impression on the reader's mind who at its end becomes conscious of the SELF within himself.' But this bliss divine for mere Rs. 45/– and Rs. 36/– respectively. postage Rs. 4·50 each.

**PRASHANTI PRAKASHAN, 5 Vasant Apartments, 47 Kastur Park, Shimpoli Road, Borivali (W), Bombay 400 092.**

# .... श्रीसाईकृपा ....

—श्री. गणपतराव सामंत एम्. ए.
व्यवस्थापक–श्रीमहालक्ष्मी ट्रस्ट,
महालक्ष्मी मुंबई २६

श्रीसाईबाबांनी हयातीत बरेच चमत्कार केले पण समाधिस्त झाल्या पासून म्हणजे आक्टोबर १९१८ पासून त्यांचे चमत्कार प्रत्येक साईभक्तास अनुभवण्यास मिळतात याचा अर्थ श्रीसाईबाबांनी आपला शब्द खरा केला आहे.

श्रीमहालक्ष्मी मंदिराच्या पाठीशी ( पश्चिमेस ) अफाट अरबी समुद्र आहे. या समुद्राच्या लाटा भरतीच्या वेळी श्रीमहालक्ष्मी ट्रस्टच्या श्रीदर्या हनुमान व श्री दर्या गणेश मंदिरावर आदळतात. विशेषतः अमावास्येला भरती जोरदार असते. अशीच जोरदार भरती व वादळ १ जुलै ८१ ( अमावास्या ) या दिवशी होती. आमच्याकडे पूज्य गुळवणी महाराजांचे अनुग्रह घेतलेले श्री. गजानन मायळंकर नावाचे तरुण ब्रह्मचारी पुजारी श्रीदर्या गणेश मंदिरात पुजाऱ्याचे काम करतात. वरील दिवशी दुपारी एक वाजता श्री गजानन पुजारी अमावास्येचा नारळ देण्यासाठी समुद्राकडे गेले. समुद्रास नारळ अर्पण करता करता नकळत एक जंगी लाट येऊन श्रीगजानन समुद्रात फेकले गेले. शरीराने कृश–पोहता येत नाही. कोणाचे लक्ष नाही. पण बचावले हा चमत्कार.

श्री गजानन माझ्याकडे श्रीसाईबाबांची हररोज सकाळी पूजा करून जातात. पहाटे त्यांना दुसऱ्या दिवशी स्वप्न पडले व त्या स्वप्नात "श्रीसाईनाथ–श्रीसाईनाथ" अशी स्पष्ट वाणी झाली. याचा स्पष्ट अर्थ श्रीसाईबाबांनी त्यांचे रक्षण केले.

दुसरी महत्त्वाची गोष्ट जी इतर जनांस माहित नाही ती अशी की श्रीमहालक्ष्मी मंदिराच्या उत्तरेसच पायथ्याशी श्रीमहालक्ष्मी, श्रीमहाकाली व श्रीमहासरस्वतीची तीन कुंडे आहेत व दरवेळी तेथे बळी जातो असे मानतात. श्रीसाईबाबा पाठिराखा असल्यामुळे आपण वाचलो असे श्रीगजानन यांनी मला स्पष्ट सांगितले. ही चित्तथरारक बातमी ऐकून मी स्तिमीतच झालो व इतरानाही आश्चर्य वाटले. वरील कुंडात एक तरुण बळी गेल्याचे मी दोन महिन्यापूर्वी पाहिले आहे.

श्रीसाईबाबांचे चमत्कार मी वाचलेले आहेत–पाहिलेले आहेत व अनुभवलेले आहेत. प्रत्येक साईभक्तास बाबांचे अनुभव येतात. असाच एक खास अनुभव खाली देत आहे.

गेल्या आणिबाणीत सुक्याबरोबर ओलेहि जळले. मी त्यावेळी सरकारी नोकरीत औरंगाबाद येथे होतो. चांगल्या हुद्यावर होतो. तेथे आलेल्या काही उच्च सरकारी अधिकाऱ्यांची 'सोय' करता आली नाही म्हणून मला तावडतोब काढण्यात आले. आणीबाणी असल्यामुळे न्याय मिळणे कठीण शिवाय सत्तेविरुद्ध भांडावयाचे म्हणजे बराच पैसा हवा.

मी आज अनेक वर्षे श्रीसाईबाबांची भक्ति करतो पण काहीच मागत नाही किंवा कोणत्याही प्रसंगी साकडे घालत नाही. कारण श्रीसाईबाबा सर्वज्ञ असल्यामुळे मी स्वस्थच राहिलो. लगेच छोट्याश्या प्रयत्नाने फार मोठी म्हणजे महाव्यवस्थापकाची जागा मिळाली बशिला श्रीसाईबाबा, नंतर मंत्रालयात चौकशी झाली. आणिबाणी संपली व माझ्यावर खरोखरच अन्याय झाल्याचे सिद्ध झाले. पण सरकारी नोकरीत परत रहावयाचे नाही असा निर्णय घेतला व त्यानंतर श्रीसाईबाबांनी इतर मानवी वशिल्याशिवाय उच्च अधिकार दिला पण ते सर्व अधिकार बाबांनी सोडावयास लावून आज गेली दोन वर्षे श्रीमहालक्ष्मीसारख्या ख्यातनाम ट्रस्टवर व्यवस्थापक म्हणून बाबांनी मला बसविले.

या जागेवर काम करताना मोठमोठ्या व्यक्तीशी, संस्थेशी संबंध येतात. मनाप्रमाणे मदतकार्य करता येते. सर्व विश्वस्थांचा संपूर्ण विश्वास व महत्वाची गोष्ट म्हणजे अनेक साधु-संतांचे अचानक दर्शन व गाठीभेटी होतात. श्रीसाईबाबांना नवस करणे, साकडे घालणे मी कधीच करत नाही पण मनःपूर्वक मी त्यांना लोटांगण घालतो. आज मी एका उच्च स्थानावर सुखासमाधानाने काम करत आहे. यापेक्षा सुख ते कोणते ? श्रीसाईबाबांना देव मानल्यावर त्यांच्याकडे काही मागणे म्हणजे त्यांना देव न मानण्यासारखे आहे कारण देवाला सर्वज्ञ म्हणतात. त्याला आपली सुख-दुःखे, अडचणी माहीत असतात. त्याला रडकथा का सांगायची ? आपली उत्कट इच्छा व प्रेम असल्यास बाबा मदतीला धावणारच याची खात्री असावी.

एकदा साताऱ्याचे बालयोगी व साईभक्त श्री गोविंदमहाराज ( वय सुमारे १८ वर्षे ) माझ्याकडे अचानक आले. कसलीच प्रसिद्धी नसताना, गाजावाजा न करता पाचपन्नास माणसे जमली. माझ्याकडे श्रीसाईबाबांचे जुने तैलचित्र आहे. त्या

फोटोसमोर बालयोगी उभे राहिले. तेथेच फोटोजवळ असलेले कमळ त्यांनी बाबांच्या पायाशी धरले व मला ओंजळ करून उभे राहावयास सांगितले. तावडतोब ते कमळ माझ्या ओंजळीत उलटे केले. पाणी ओंजळ भरून वाहायास लागले. मी सर्व ओंजळ पाणी प्राशन केले. नंतर त्यांनी सर्व लोकांस त्या कमळातून तीर्थ दिले. कमळात किती पाणी असणार ? जास्तीत जास्त दोन-चार थेंब. हा चमत्कार मी स्वतः अनुभविला. नंतर बालयोगी माझ्याकडे आणखी दोन वेळ आले व त्यांनी अनेक चमत्कार केले. त्यांनी श्रीसाईबाबांच्या पुतळ्यास पुरणपोळी भरवली ! ! असे अनेक चमत्कार पुष्कळांनी पाहिले. मी त्यांना परत कधी येणार म्हणून विचारले. " आईचे ( श्रीमहालक्ष्मी ) बोलावणे येताच " असे उत्तर देऊन चालत राहिले. " तुझ्याकडे सतत पाणी राहील " असा आशीर्वाद देऊन ते निघून गेले.

असो. श्रीसाईबाबा असे चमत्कार करून घेतात-करतात याची वरील उदाहरणे.

☆


सरगम—संगीत सागर तर्फे

श्रीसाई भक्तांसाठी श्रवणीय नवीन कॅसेटस

## श्रीसाई गीतांजली

संगीत, गायक — कृष्णा शिंदे
गीते— ग. रा. पालकर
संपर्क—" संगीत सागर " सी, ११३ पी. ओ. आय. आय. टी. पवई मुंबई ४०००७६

**A साईड**

१. भूपाळी, काकड आरती
२. मशीदीत प्रगटला परमेश्वर
३. व्हावे साईनाथा कृपावंत
४. साई तेरो नाम
५. साई नामावली, आरती

**B साईड**

१. गर्जा जयजयकार, गजर
२. अगाध साई किमया न्यारी
३. पावते समाधी
४. साई चिंतनाने
५. आरती-शेजारती

मुंबईतील सर्व प्रमुख रेकॉर्ड, कॅसेट विक्रेत्यांकडे उपलब्ध

[ आगामी आकर्षण " श्रीदत्त भजन " लुळे अखेर प्रसिद्ध ]

गोकुळ अष्टमी निमित्य खास लेख

# श्री रणछोडराय

–ले. कर्नल मु. ब. निंबाळकर ( निवृत्त )
११२४ फाईव्ह स्टार अपार्टमेंटस
बंड गार्डन रोड, पुणे ४११००१

● गुजरातेत श्रीकृष्ण यांना 'रणछोडराय' असे म्हणतात. त्यांचे डाकोर येथे मोठे व प्रसिद्ध मंदीरही आहे. 'रणछोड' म्हणजे रणांगण सोडून पळून जाणारा व राय म्हणजे राजा. श्रीकृष्णांची खूप नावे महाभारतात व भागवतात आहेत. गीतेतच ४० वेगवेगळ्या नावाने त्यांना संबोधिले आहे. परंतु गुजरातने नेमके हेच नाव कसे उचलले याचे मला मी स्वतः सेनाधिकारी असल्याने सारखे आश्चर्य वाटत होते.

साधारणतः कुठल्याही थोर व्यक्तींना संबोधिताना त्यांच्या उत्तम गुणांची विशेषणे लावली जातात. उदा. श्रीकृष्णाला 'पुरुषोत्तम', 'मधुसूदन', 'अच्युत' अर्जुनाला 'भरतश्रेष्ठ', 'धनंजय', 'पुरुषव्याघ्र' वगैरे. मग 'रणछोड' हे विशेषण की जे जगात लांच्छनास्पद समजले जाते ते गुजरातेतील भक्तजन आपल्या इष्ट-देवाला श्री कृष्णाला का लावतात ? कौतुकाने व अत्यंत प्रेमाने त्याला त्या नावाने का हाक मारतात व त्याची स्तुति-गीते का गातात ?

"रणछोड तुं रंगीलो नाथ, विश्व सकळने म्हारो साथ।
भूमि केरो हरवा भार, जगमां प्रगटयो वारंवार ॥"

मगध देशाचा राजा जरासंध व म्लेंच्छांचा राजा कालयवन हे दोघेही बलाढ्य शत्रु मथुरेवर मोठ्या सैन्यासह एकत्र चाल करून आले त्यावेळी श्रीकृष्ण मथुरा सोडून पायी पळत निघाले म्हणून त्यांना 'रणछोड' असे म्हणतात. वरकरणी जरी हे एखाद्या भ्याड पळपुट्या शिपायासारखे लांच्छनास्पद दिसले तरी ते तसे नव्हे. श्रीकृष्ण हे काही सामान्य पुरुष नव्हते. लहान वयातच त्यांनी कितीतरी बलवान राक्षसांना व कंसासारख्या त्यांच्या राजाला मल्लयुद्धात मारले होते. पुढे मूर, निशुम्भ सारख्या दैत्यांचा व नरकासुरसारख्या महान् योद्ध्यांचा वध केला होता आणि बाणासुरासारख्या बलाढ्य वीराचे हजार बाहू छेदून त्याचा पराजय केला होता. एकट्याने रुक्मी व इतर वीरांचा पराभव करून रुक्मिणीला पळवून आणले होते. कौरवांच्या

सभेत पांडवाकडून शिष्टाई करायला गेले असताना दुर्योधनाने त्यांना एकटे पाहून कैद करण्याचा घाट घातला होता. परंतु श्रीकृष्ण तेथून आपल्या प्रचंड तेजाने सर्वांना घाबरून सोडून, निघून आले होते. असा शूर पुरुष रणांगण सोडून भीतीने पळून जाणे कधीतरी शक्य आहे का ! मग मथुरेत हे कसे घडले ? तर श्रीकृष्णाचा हा युद्धातील एक डाव होता.

कंसाच्या दोन्ही राण्या अस्ति व प्राप्ति ह्या जरासंधाच्या मुली होत्या. श्रीकृष्णाने कंसाचा वध केल्यावर त्या आपल्या वडिलांकडे परत गेल्या होत्या. त्यामुळे जरासंध श्रीकृष्णावर चिडला होता व त्याने आपल्या २३ अक्षौहिणी सैन्या-सहित मथुरेवर चाल केली. एक अक्षौहिणी म्हणजे २१८७० रथ, २१८७० हत्ती, ६५८४९ घोडेस्वार व १०४५०० पायदळ. असले २३ अक्षौहिणी म्हणजे जरासंधाचे सैन्य केवढे मोठे होते याची वाचकाना कल्पना येईल. तरीदेखील श्रीकृष्ण व बल-राम या दोघानी त्यांना परतवून लावले. अशाप्रकारे जरासंध मथुरेवर एवढेच सैन्य घेऊन १७ वेळा चाल करून आला परंतु प्रत्येकवेळी त्याला पराभूत होऊन परत जावे लागले.

नंतर १८ व्यावेळी त्याने कालयवन नावाच्या म्लेंच्छ राजाशी संगनमत केले व त्याच्या ३ कोटी सैन्यासह मथुरेवर चाल करण्याचे ठरविले. तेव्हा श्रीकृष्णाने दूर पश्चिम समुद्र किनाऱ्यावर सुरक्षित अशी द्वारका नगरी बांधून घेतली व तेथे सर्व यादवाना व त्यांच्या मुलाबाळांना पाठवून दिले. नंतर आपण एकटेच मथुरेच्या मुख्य दरवाजातून कुठलेही शस्त्र न घेता बाहेर आले व पायीच पळत सुटले. अशा-प्रकारे श्रीकृष्णाला एकट्याला धावत जाताना पाहून कालयवनही त्यांना पकडण्या-साठी एकटाच त्यांचे मागे पळू लागला. श्रीकृष्ण मूळातच धूर्त व चपळ. कालयवा-नला चकवीत चकवीत त्यांनी त्याला एका गुहेजवळ नेले व स्वतः त्यात ते शिरले. श्रीकृष्णाला नारदाकडून कळले होते की त्या गुहेत मुचुकुन्द नावाचा राजा ज्याने त्रेता युगात देव व असुर यांच्या संग्रामात देवाना मदत केली होती व युद्धात थकल्यामुळे देवांकडून दीर्घ नीद्रेचा वर मागून घेतला होता. श्रीकृष्णाना हेही माहीत होते की मुचुकुंदांची जो झोपमोड करेल त्याला ते जाळून भस्म करतील. म्हणून त्या गुहेत अंधारात श्रीकृष्ण लपून राहिले. इकडे कालयवन त्याना शोधीत गुहेत आला व अंधारात त्याने मुचुकुन्दाना झोपलेले पाहिले. त्याला वाटले श्रीकृष्णच ढोंग करून झोपलेत म्हणून त्याने त्यांना जोराने लाथ मारली. त्याबरोबरच मुचुकुन्द जागे झाले व आपणाला कुणी तरी लाथ मारली हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे ते चिडले व त्यानी कालयवनाकडे रागाने पाहिले. त्याबरोबरच तो जागच्या जागीच भस्म झाला व श्रीकृष्णांचे कार्य सिद्ध झाले.

यावरून वाचकांच्या लक्षात येईल की श्रीकृष्ण मथुरेतून पळत सुटले ते युद्धाच्या किंवा शत्रुच्या भितीमुळे नव्हे तर त्यात त्यांची युद्धनीति होती. महाभारताच्या श्रीहरिवंशपुराणात म्हटले आहे–

बलिनः संनिकृष्टे तु न स्थेयं पण्डितेन वै ।

अपक्रमेद्धि कालज्ञः समर्थो युद्ध मुद्वदेत् ॥ विष्णुपर्व अ० ३९ श्लो. ८ ॥

( विद्वान पुरुषाने बलवान् शत्रुच्या जवळ थांबू नये. वेळप्रसंगाचे ध्यान ठेवणाऱ्या पुरुषानी बलवान् शत्रुपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी आपले ठिकाण सोडून बाजूस सरावे व शत्रु सैन्याशी लढण्याची ताकद आली की युद्धास तयार व्हावे )

आधुनिक काळात देखील हीच नीति युद्धशास्त्रात ( War Manuals ) सांगितली आहे. सैन्यांच्या पाठशाळेमध्ये लढायाच्या प्रकारात ( Operations of War ) जसे आक्रमण ( attack ) संरक्षण ( defence ) शिकविले जाते तसेच माघार घेणे ( Withdrawal ) हा प्रकारही शास्त्रोक्त शिकविला जातो. दुसऱ्या महायुद्धात सन १९४० मध्ये फ्रान्समधून इंग्रजानी डंकर्क ( Dunkirk ) येथून हिटरलच्या फौजेपासून माघार घेतली हे प्रसिद्धच आहे. त्यामुळे इंग्लंडच्या सैन्याचा सर्वनाश न होता त्यांना पुढे युद्ध जिंकता आले. तसेच सन १९४२ मध्ये उत्तर आफ्रिकेत ८ व्या ब्रिटीश आर्मीने जर्मन योद्धा रोमेल याच्या जोरदार आक्रमणामुळे माघार घेतली व नंतर सैन्याची कुमक मिळताच जनरल मॉंटगोमेरी याच्या नेतृत्वाखाली चढाई केली व जर्मन सैन्याला आफ्रिकेच्या बाहेर पार ढकलून काढले. आपल्याकडीलच उदाहरण घ्यायचे ठरविले तर श्री शिवाजी महाराज पन्हाळगडावरून बलाढ्य विजापूर दरबारच्या सैन्याच्या वेढ्यातून विशाळगडावर पळून गेले म्हणून त्यांना काय आपण भ्याड व पळपुटे समजतो ?

श्रीकृष्णांचे वैशिष्ट्य हे की त्यांनी कुठलेही काम करताना लोकमताची किंवा रूढीची पर्वा केली नाही. फक्त ते काम जगाच्या किंवा भक्ताच्या कल्याणाचे असले म्हणजे झाले. लहानपणी गोपींशी त्यांच्या भक्तीपायी यमुनेच्या तीरावर मध्यरात्री रासक्रीडा केली, रुक्मिणीचे तिच्या विनंतीपत्रावरून हरण, केले, पांडवांच्या राजसूय यज्ञात त्यांच्या स्नेहापायी ब्राह्मणांचे पाय धुतले आणि कौरव-पांडव युद्धात अर्जुनाचे सारथ्यही केले. तसेच कालयवनाविरुद्ध मथुरेतून पळून जाताना मथुरेच्या प्रजेच्या संरक्षणासाठी व दुष्टांचा नायनाट करण्यासाठी आपल्याला लोक पळपुट्या म्हणतील की काय याची पर्वा केली नाही.

म्हणूनच गुजरातचे लोक श्रीकृष्णाला मोठ्या प्रेमाने व भक्तीने ' रणछोडराय ' म्हणून हाक मारतात.

# संत चूडामणी भगवान श्रीसाईबाबा

## भव्य प्रकाशन समारंभ

श्रीसाईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी लिहिलेल्या व अंजली प्रकाशन पुणे ने प्रकाशित केलेल्या " संत चूडामणी भगवान श्रीसाईबाबा " या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ शिर्डी येथे समाधीमंदिरासमोरील प्रांगणात गुरुपौर्णिमा शुक्रवार दिनांक १७ जुलै १९८१ रोजी दुपारी ४ वाजता थाटात पार पडला. या प्रसंगी संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. क. हि. काकरे साहेब अध्यक्ष या नात्याने उपस्थित होते. त्यांचेच शुभ हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

सुरुवातीस पुस्तकाचे लेखक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी प्रास्ताविक निवेदन करून हे आपले ५१ वे पुस्तक होय, व या संकल्पीत पुस्तकाची कल्पना माजी रिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक यांनी दिलेली होती असे सांगितले. त्यानंतर प्रकाशक श्री. आनंद साने यांनी आपण सुरू केलेल्या गूढवाद, आध्यात्म व संत चरित्र यापैकी संतमाला प्रकाशनापैकीचे हे पहिलेच प्रकाशन होय असे सांगितले.

श्रीसाईबाबा कालीनपासूनचे वयोवृद्ध भक्त श्रीमान नानासाहेब रासने यांनी या पुस्तकाला शुभाशित प्रदान करून लेखकाच्या हातून श्रीबाबांची अखंड सेवा व्हावी अशी सदिच्छा प्रगट केली. प्रवचनकार ह. भ. प. श्री. कवीश्वर बुवा यांनीही याप्रसंगी समयोचित भाषण करून श्री. चेंदवणकर व आपले एकावेळचे स्नेहसंबंध सांगून गत स्मृतींना चांगलाच उजाळा आणला.

श्री. काकरेसाहेब यांनी लेखकाचे अभिनंदन करून पुस्तकाचे प्रकाशन झाल्याचे जाहिर केले. शेवटी आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रम संपला. या समारंभ प्रसंगी श्रीसाईबाबा संस्थानचे ऑफीस सुपरिटेंडेंट श्री. द. चिं. पाठकसाहेब हे पण हजर होते. शिरडीत या पुस्तकाच्या अवघ्या दोन तासात ८० वर प्रती संपल्या. पुस्तकाची मूळ किंमत ३० रुपये असून सवलतीने ती २० रु. किंमतीस देण्याचे प्रकाशनांनी ठरविले आहे. पुस्तक प्रकाशन समारंभ प्रसंगी अनेकांनी लेखकास शुभेच्छा तारा व पत्रे पाठविली होती तर अनेकांनी समक्ष भेटून शुभेच्छा प्रदर्शित केल्या.

# श्रीसाईगीत तुषार

## पालखी चाले पालखी चालेरे (१७)

श्री साईंच्या दिव्य सामर्थ्याने भारावून गेलेल्या अनेक भक्तांना रोज नवीन अनुभव येतच होते. साईसारखा गरीबांचा कनवाळू दाता सद्गुरु आपणास भेटला म्हणून साऱ्या भक्तांना त्याचा अभिमान वाटे गुरुपौर्णिमेचा तो दिवस उगवला. सर्व भक्त द्वारकामाईत गोळा झाले. श्री साईंची भक्तीभावाने पूजा केली. प्रत्येक भक्ताने आपल्या इच्छेने गुरुदक्षिणा दिली. एक सुंदर रथ सजवला व साऱ्या गावातून साईंची मिरवणूक काढली. साऱ्या गावाची जणू जत्रा होते. अशा थाटात गावभर हर्षोनाद उमटला होता. सुवासिनी साईंना ओवाळून पाठीराख्या सद्गुरुंना वंदन करीत होत्या. असा हा रम्य सोहळा. वर्णन करावयास शब्दही संपू लागतात.

पालखी चाले पालखी चाले, पालखी चाले रे
माझ्या बाबांची, माझ्या साईंची, आज बघा पालखी चाले रे ॥ धृ ॥

रम्य सोहळा शिर्डी चालला
स्वर्ग धरेला आज भेटला
ढोल ताशाचा नाद गुंजला
ज्योतिनें बघा प्रकाश पाहिला
साई आले, साई आले, साई आले रे ॥ १ ॥

आज बघा हो रथ सजला
दश दिशांनी रंग उधळला
सप्त सागरी शेष पहुडला
भक्त सारे उभे सेवेला
काय चाले, काय चाले, काय चाले रे ॥ २ ॥

गुरु पौर्णिमा दिस उगवला
शिर्डी क्षेत्री सोहळा चालला
आशिर्वाद साई दिधला
क्रमा क्रमाने रथ चालला
साई बोले, साई बोले, साई बोले रे ॥ ३ ॥

साई प्रभुंना प्रथम वंदिला
भक्त जनांनी गुरु मानला
सान्या स्त्रीयांनी आरत्या आणल्या
षडोपचारे साई पुजिला
आरती चाले, आरती चाले, आरती चाले रे ॥ ४ ॥

प्रभुरामाचा सोहळा चालला
मुर्तीरुपे साई बैसला
बहू श्रमाने दिस उगवला
तेथूनी बघा सोहळा चालला
अल्ला साई, राम साई, रहिम साई रे ॥ ५ ॥

## प्रभुरामाने वचन दिधले जैसे (१८)

श्री साईंचा पुर्नजन्मावर पूर्ण विश्वास होता. जन्म जन्मांतरीचे फेरे साईंना ज्ञात होते. भक्ताला मागिल जन्मी दिलेले वचन पूर्ण करण्यास ते तत्पर असत. डुबकी नावाच्या विधवा गरीब स्त्रीने आपली जमिन शंकराच्या मंदिरास दान दिली. परंतु गावातील दुष्ट सावकाराने ती गिळंकृत केली. पुढे वादळात ती दोघे मृत्युमुखी पडली. ती दोघे पुर्नजन्मात विरभद्रप्पा व चनबसप्पा म्हणून जन्माला आली. मागिल जन्माचा वैराग्नी पुन्हा प्रज्वलीत झाला. विरभद्रप्पाच्या भितीने चनबसप्पा साई चरणी शरण आला. साईंनी त्याला वचन दिले. तू काय घाबरतोस मी तुझे रक्षण करीन. तिसऱ्या जन्मात साप झालेल्या विरभद्रप्पाच्या मुखातुन बेडूक झालेल्या चनबसप्पाला साईंनी सोडविले व आपले वचन पूर्ण केले.

प्रभू रामाने वचन दिधले, जैसे सुग्रीवाला
बसप्पा सुटकेसाठी, साई प्रभू धावला ॥ धृ ॥
साई बैसे ओढ्याकाठी
बोध करी निर्मळ ॥
चित्रकूटी ज्ञान देई
राम प्रभु तो सुंदर ॥
अशी एकदा ऐकू आली
किंकाळी कानी ॥
सापाने हो मुखी पकडला बेडूक प्राणी ॥ १ ॥

त्वरीत धावले ओढ्याकाठी दृश्य पहाण्याला
काय करतो विरभद्रप्पा सोड बसप्पाला
गत जन्मीचे वैर संपले गेले लयाला
तिन जन्मे घेऊन सुद्धा शुद्र पणा दाविला ॥ २ ॥

साई बोलता सापाने हो सोडले बेडकाला
गत जन्मीचे वैर सारे विसरुनी गेला
अति आनंदाने बेडूक, साई चरणी आला
वंदन करुनी प्रेमभावे, मार्गी हो लागला ॥ ३ ॥

चमत्कार पाहूनी सारे पुसती साईला
कोण बसप्पा, विरभद्रपा सांगा आम्हांला
सापाने हो कां, सोडले आज बेडकाला
मुक्या जिवांचे दुःख कैसे शात साईला ॥ ४ ॥

डुबकी नामक विधवा स्त्री हो भजे शंकराला
जमिन जुमला सारा देई, मंदिर बांधायाला
सावकाराने लुटले सारे, गरीब डुबकीला
वादळीने मृत्यु पावली पुर्नजन्म झाला. ॥ ५ ॥

विरभद्रप्पा बसप्पा हो आले जन्माला
विरभद्रप्पा करी वल्गना मारीन बसप्पाला
वचन दिधले साईनी हो गरीब बसप्पाला
म्हणून सापाने हो सोडले, आज बेडकाला ॥ ६ ॥

—श्री. सुहास देसाई
सी. जी. एस. कॉलनी, बिल्डिंग नं. १९०
ब्लॉक नं. १९४० अँटॉप हिल मुंबई ४०००३७

☆ ● ☆

# पाच तत्वे

१

पाचा तत्वाचेच पाच पाच गुण
ऐसे झाले जाणा ॥ १ ॥
त्यामाजी सत्व रज आणि तम
त्रिगुण हे सार मिळविले ॥ २ ॥
हीच अठ्ठावीस युगे पूर्ण झाली
देहा देहीच आहे प्रत्येकाच्या ॥ ३ ॥
अठ्ठावीस युगे पांडुरंग उभा
परेच्या विटेवर हरी म्हणे ॥ ४ ॥

२

प्रथम ते तत्व आकाशी प्रगटले
आकाशापासूनी वायु होय ॥ १ ॥
वायुपासूनी अग्नी प्रकाशला
अग्नीतून निघाले जळ साच ॥ २ ॥
जलातून आकारली मूर्त रूप भूमी
इथे पंच तत्वे पूर्ण झाली ॥ ३ ॥
याची तत्वांचा तू घट हा घडविला
हरी म्हणे कुंभार देव झाला ॥ ४ ॥

–श्री. हरिभाऊ बोबडे, एम. ए.
अध्यापक श्री कान्होजीबाबा विद्यालय,
मु. पो. अंजनसिंगी, ता. चांदूर
जि. अमरावती

# संतांची फुले

फुललीं फुलें ही जगतात । शिर्डीत माझा साईनाथ ॥ ध्रु० ॥

ज्ञानेश्वर बटमोगरा । याने केली उज्वल धरा ।
नामदेव पारिजातक । शिर्डीत माझा साईनाथ ॥ १ ॥

पुंडलीक शिरीष शोभतो । विठ्ठल पुढे उभा केला ।
कबीर मंदीर दिसतो । शिर्डीत माझा साईनाथ ॥ २ ॥

चोखा गुलाब दिसला । सावता केवडा शोभला ।
गोरा झाला असे कुंद । शिर्डीत माझा साईनाथ ॥ ३ ॥

रामदास असे सोनचाफा । याने फुलविले त्रिवीध तापा ।
तुकाराम निशीगंध । शिर्डीत माझा साईनाथ ॥ ४ ॥

एकनाथे केली मात । ते दिसले हो कमलात ।
वासुदेव आनंद । शिर्डीत माझा साईनाथ ॥ ५ ॥

मुक्ताबाई जनाबाई । ह्या ग फुलल्या जाईजुई ।
रातराणी सखू संत । शिर्डीत माझा साईनाथ ॥ ६ ॥

कान्होपात्रा ही चमेली । मीरा बकूळ शोभली ।
बहरली रामबाई शेवंती । शिर्डीत माझी द्वारकामाई ॥ ७ ॥

बहीणा ही अबोली । अक्का दिसते सायली ।
वेणू तुळस मंजीरी । शिर्डीत माझी द्वारकामाई ॥ ८ ॥

देवी अहिल्या मधुमालती । तीचा सुगंध साऱ्या जगती ।
दानशूर ही गुणवंत । शिर्डीत माझा साईनाथ ॥ ९ ॥

वारा अमोल पुष्प रत्ने । शिरीं धरीली साईने ।
संतांच्या लीला आनंदाने गाऊ । शिरडीचा साईनाथ डोळे भरी पाहू ।

—लीलावती गुजराथी
शिर्डी

# साईबाबांचा संदेश

साई; भक्तांचे श्रद्धास्थान
कर रे आम्हा कृपा प्रदान—

मुखे म्हणा साई-साई
भोळया भक्तांची ही आई
जे का रंजले गांजले
त्यास ममतेची उब देई—

गरिबास जगात या
अभिमान हाच आहे
साई त्याचा, तो साईचा
नाते जगी दिव्य आहे—

जातपात भेद-भाव
देव कधी पाळतो का!
सारी त्याचीच लेकरे
असे तो साऱ्यांची आई—

प्रेम करा जगावर
प्रेम करा प्राण्यांवर
संदेश साईबाबांचा थोर
भावनेचा हा फुलोर
पाळून जन्म करा थोर—

—श्री. मनोज शंकर वैद्रे
कॉलेज ऑफ इंजिनियरिंग हॉस्टेल,
'बी' ब्लॉक खो. नं. ४६ शिवाजीनगर पुणे ६

# नौकेचा आधार

सुंदर ते ध्यान । बैसे सिंहासनी ।
सदोदित उल्हासित । अशी तेजो मूर्ति ॥ धृ ॥
गळा पुष्प माला । नाना अलंकार ।
शाल खांद्यावरी । पांघरुनि येई ॥ १ ॥
मस्तकी मुकुट । शोभे मनोहर ।
पाहोनी ते रुप । मन तृप्त होई ॥ २ ॥
सभोवार तुमच्या । भक्तांची ती दाटी ।
भक्तीच्या रसाने । तृप्त होशी ॥ ३ ॥
आशिर्वाद देशी । हात उंचाऊनि ।
परतोनी न जाय कोणी । रिक्त हाती ॥ ४ ॥
कलीयुगी भवनदी । आला महापूर ।
नौकेचा आधार । साई रुपे ॥ ५ ॥

—सौ. कुमुदिनी यशवन्त टिळक
८ लक्ष्मी–निवास, आपटे वाडी
ला. ब. शास्त्री मार्ग घाटकोपर मुं. नं. ८५

卐

# शिरडीचे साईबाबा

शिरडीचे साईबाबा । तुम्हा दंडवत
दाखविला चमत्कार । जळी लाऊनिया वात ॥ धृ० ॥
आठव करीता आम्ही । येसीना धावत
संकटास निवारीसी । दीऊनीया हात ॥ १ ॥
अनाथांची तू माऊली । करी कृपेची साऊली
केव्हा पाहीन चरण । आस मम हृदयात ॥ २ ॥
अपराध घाली पोटी । होऊनिया कृपावंत
दास लागलासे पायी । पुरवावा माझा हेत ॥ ३ ॥

सौ. लीलावती श्री. उपाध्ये
द्वारा श्री. श्रीपाद र. उपाध्ये

# पादुकांची आस

ही पुरे एवढी गतजन्माची पुण्याई
दे घट्ट धराया पाय तुझे रे साई !

तव पायापाशी अन्य मागणे नाही
दे घट्ट धराया पाय तुझे रे साई !

ह्यालीस माझी तू अश्रु पुसती आई
तैसाच बनोनी बाप, सांभाळ मला तू साई !

तुज वाचुनि मजला दैवत दुसरे नाही
लेकरू तुझे हे कडिये खांदा वाही !

हे पाय पुरातन तुझेच देवा असती
ते धरल्याने रे कितीक तरले जगती
म्हणुनि वाकवीत माथा पायावरती
ये धावून झडकरी·दर्शन देई

या जगि न आता उरले मजला कोणी
घे लवकर साई तुझ्यात सामावोनि
नेऊ कुठे हे गाऱ्हाणे रे साई ?

—श्रीमती श्री. शहाणे
लक्ष्मी निवास, गडकरी रोड,
डोंबिवली पूर्व, जि. ठाणे

# संस्थानचे अभिषेक पुजारी श्री. भालेराव साईचरणी विलीन

श्रीसाईबाबा संस्थानचे एक प्रामाणिक आणि कार्यतत्पर पुजारी श्री. दिवाकर पुरुषोत्तम भालेराव यांचे ७ जून १९८१ रोजी सकाळी सव्वा आठ वाजता पुणे येथील डॉ. मुळये यांचे रुग्णालयात निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ५७ वर्षाचे होते. गेले कित्येक दिवस ते आतड्याच्या विकाराने आजारी होते पण असे असूनही ते नियमितपणे संस्थानच्या सेवेत हजर रहात व सोपविलेली कामगिरी ते पूर्ण करीत असत.

श्री. भालेरावजी हे मूळ जुन्नर तालुक्यातील बेल्ह्याचे. त्यांचे वेद मंत्र विद्याभ्यासाचे शिक्षण दहिसर येथे झाले. मशिदबंदर येथील जुन्यामारुती मंदिरात ते मुख्य पुजारी म्हणून १९ वर्षे नोकरीस होते. श्रीसाईबाबा संस्थानचे माजी कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक यांनी त्यांची कार्यकुशलता पाहून त्यांची नेमणूक १ नव्हेंबर १९७१ रोजी समाधी मंदिरातील पुजारी म्हणून केली तेव्हा पासून तो अखेरपर्यंत त्यांनी श्रीबाबांची व भक्तांची सेवा निष्ठेने केली. अभिषेक प्रसंगी संस्कृत श्लोकांचे व मंत्रांचे, शब्दांचे त्यांचे उच्चार अगदी सुस्पष्ट असत. श्रीसत्यनारायणाची पूजाही विधी व्रत सांगण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. मूर्ती प्रतिष्ठापना करण्यापूर्वीचा यथायोग विधी त्यांना पूर्ण अवगत होता. साईदर्शनासाठी येणाऱ्या भक्तमंडळीशी ते अतिशय आपुलकीने व प्रेमाने वागत. त्यांच्या निधनाने संस्थानचा एक प्रेमळ निष्ठावान कर्मचारी कायमचा दृष्टी आड झाला आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त ऐकून असंख्य भक्तांना व त्यांच्या हितचिंतकाना हळहळ वाटणे अगदी सहाजिक आहे. त्यांच्या पश्चात् त्यांच्या पत्नी श्रीमती वत्सला काकू व तिन कन्यका शुभांगी, अंजली व वैशाली या आहेत; त्या सर्वांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# शिरडी-वृत्त माहे जून सन १९८१

या महिन्यात बाहेर गावातून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी पहिल्या पंधरावड्यात जास्त प्रमाणात होती. हायस्कूल, कॉलेज सुरू झाल्यावर गर्दीचे प्रमाण थोडे कमी झाले. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली खालील प्रमाणे :

**कीर्तन :** १) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. २) ह. भ. प. रामराव गो. ढुकरे महाराज यांचे कीर्तन झाले, बुलढाणा,

**प्रवचन :** १) ह. भ. प. पंढरीनाथ कोन्हाळेबाबा नेवासा यांचे प्रवचन झाले, २) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे शिरडी यांचे प्रवचन झाले.

**भजन, गायन, वादन :** १) योगीकृपा भजनी मंडळ, मोडासा गुजरात. २) श्री. तिलकराज शि. पुटकरणा, बोरीवली. ३) श्री. जयेन्द्र कल्याणी मुंबई. ४) श्री. हसमुख ओं. पाटील, नवापूर. ५) श्री. पी. सुमित्र आचार्य, कर्नाटक. ६) श्री. चंदन च. रेड्डी, नागपूर. ७) श्री. मधुकर भावे, न्युदिल्ली. ८) सौ. सुनिता ग. केळकर, सांगली. ९) श्रीमती विमलबाई भा. शिर्के जळगाव. १०) श्री. नरेश ल. सोमण नागपूर. ११) सौ. उमा मोकाशी मुंबई. १२) श्री. विठ्ठल वि. मांजरेकर शिरडी. १३) श्रीमती प्रेमलता गुप्ता, चंदिगड. १४) श्री. गजानन ताडे, खेरागड. (म. प्र.) १५) श्री. ब्रह्मचैतन्य महिला भजनी मंडळ, अहमदनगर.

**हवापाणी :** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही थोडा थोडा पाऊस पडण्यास सुरवात झाली.

☆

## श्री. किसनसिंग ठाकूर यांचे निधन

शिर्डी द्वारकामाईतील एक सेवेकरी श्री. किसनसिंग नरसिंग ठाकूर हे १७ जून ८१ रोजी मुंबईत जे. जे. हॉस्पीटलमध्ये हॉर्नियाच्या विकाराने निधन पावले. शिरडीत ते ' पेन्टर ' नावाने सुपरिचित होते. बाबांच्या पालखी व रथाची सुशोभिता ते करीत तसेच द्वारकामाई नित्य स्वच्छ ठेवण्याकडे त्यांचा कल होता. गेली १० वर्षे त्यांनी येथे बाबांची सेवा केली. श्रीसाई मृतात्म्यास सद्गती देवो.

# “शिरडीवाले साईबाबा”

## साईभक्त कलाकारांना सुवर्णसंधी

भारती थिएटर्सच्या “ शिरडीचे श्रीसाईबाबा ” या मराठी नाटकानंतर हेच नाटक “ शिरडीवाले साईबाबा ” या नावाने हिंदी भाषेत ऑक्टोबरमध्ये श्री बाबांच्या पुण्यतिथिस रंगभूमिवर येणार आहे. त्यात हिंदी भाषेवर व गाण्यावर प्रभुत्व असणाऱ्या साईभक्त स्त्रीपुरुष कलाकारांना रंगभूमिवर कामे करण्याची संधी देण्यात येत आहे. ज्यांना इच्छा असेल त्यांनी वय, शिक्षण, रंगभूमीवरील कामाचा अनुभव ही माहिती, स्वतःचा पासपोर्ट साईज फोटोसह पुढील पत्त्यावर दि. १५ ऑगस्टपूर्वी पाठविणे त्याचप्रमाणे नाटकात श्रीसाईबाबांची अगाधशक्ती व स्तुती केलेली एक हिंदी ‘ कव्वाली ’ यांचा समावेश करण्यात येणार आहे. तरी साईभक्त कवींनी आपल्या पत्त्यासह “ कव्वाली ” लिहून पाठविणे–योग्य वाटल्यास उपयोग करून घेवू.

संपर्क श्री. कुमारसेन गुप्ते १४ पितांबर लेन माहीम मुंबई–१६

दूरध्वनी ४५ ६५ ४१



# श्रीसाईलीला

आगामी दोन खास अंक

१ आक्टोबर – बालसाहित्य विशेषांक

२५ आक्टोबर – दिवाळी अंक भक्त स्वानुभव विशेषांक